रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक ३१२ ॥ पृष्ठे ८ www.krushival.in

कॅल्शियम, गर्भनिरोधक गोळ्यांचा खच

पान ३ वर

कृषीवल

रायगड ॥ बुधवार, दिनांक २० एप्रिल २०२२

किंमत ४ ₹

टायगर इलेव्हन वाघोली संघ विजेता

पान ८ वर

महत्त्वाचे

राज्यात उद्या पावसाचा अंदाज

मुंबई : राज्यात काही ठिकाणी येत्या गुरुवारी, २१ एप्रिल रोजी आणि शुक्रवारी, २२ एप्रिल रोजी वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विदर्भ, मराठवाडा, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि दक्षिण कोकणात काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार शुक्रवार, २२ एप्रिल रोजी रायगडमध्ये हलक्या सरी किंवा मेघगर्जनेसह सरींची शक्यता आहे. मात्र पालघर, ठाणे, मुंबई येथे कोरडे वातावरण असेल. रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. गुरुवारी कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, अकोला, अमरावती, नागपूर, यवतमाळ येथे तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज आहे.

कोरोनानंतर रोजगारात वाढ

मुंबई : देशात कोव्हिड-१९ संसर्ग कमी झाल्यानंतर कोलमडलेले आर्थिक चक्र पुन्हा एकदा रुळावर येऊ लागल्याचे सकारात्मक चित्र दिसू लागले आहे. रोजगाराच्या संधी देखील नव्याने निर्माण होऊ लागेल्या असून, अनेक कंपन्यांनी रोजगार भरतीमध्ये वाढ केली आहे. मार्च महिन्यात वार्षीक आधाराच्या डेटावर करण्यात आलेल्या एका विशलेषणाच्या अहवालानुसार रोजगाराच्या दरात ६ टक्के वाढ झाल्याचे सकारात्मक चित्र पाहण्यात आले आहे. मॉन्स्टर एम्प्लॉयमेंट इंडेक्सने देशातील १३ शहरांमधील कंपन्यांच्या भरती डेटाचे विश्लेषण केले असून, त्यातून ही माहिती समोर आली आहे. अहवालानुसार रोजगार भरतीमध्ये मुंबई पहिल्या स्थानावर असून, येथे मार्चमध्ये नोकरभरतीचा दर २१ टक्क्यांहून अधिक असल्याचे म्हटले आहे.

पोलखोल रथाची तोडफोड

मुंबई : मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचाराची पोलखोल करण्यासाठी भाजपकडून पोलखोल अभियान सुरू केलं जात आहे. त्यापूर्वीच भाजपच्या पोलखोल रथाची अज्ञातांनी तोडफोड केली. दगड मारून या रथाच्या काचा फोडण्यात आल्या. ही तोडफोड महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केल्याचा आरोप भाजपचा आहे. चेंबूर परिसरात भाजपच्या गाडीची तोडफोड करणाऱ्या ४ जणांची ओळख मुंबई पोलिसांनी ओळख पटवली आहे. सीसीटीव्हीमध्ये दोन दुचाकींवर चार जण आल्याचे दिसून आले आहे. चौघांनी त्या गाडीवर दगडफेक करून वाहनाचे नुकसान केले असावे, असा पोलिसांचा संशय आहे.

मांडवा जेट्टीजवळ रिलायन्सच्या गॅस स्टेशननजीक आग

आरसीएफ जवानांच्या तत्परतेमुळे धोका टळला

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

मांडवा जेटीजवळील रिलायन्स कंपनीच्या गॅस स्टेशननजीक लागलेली आग आरसीएफ थळच्या अग्निशमन दल जवानांच्या तत्परतेने त्वरित विझविण्यात यश आल्याने संभाव्य मोठी हानी टाळता आली.

मांडवा जेटी रस्त्यालगत रिलायन्स कंपनीच्या गॅस स्टेशनजवळ मोठी आग लागल्याची सूचना आरसीएफ थळच्या अग्निशमन केंद्रास प्राप्त झाली. त्याचसोबत रिलायन्स, नागोठणे येथील जनसंपर्क अधिकारी रमेश धनावडे यांनी आरसीएफ जनसंपर्क विभागाकडे आरसीएफ थळच्या अग्निशमन दलाच्या मदतीसाठी दूरध्वनीवरून विनंती केली. घटनेची गांभीर्याने दखल घेत, आरसीएफ प्रशासनाने अग्निशमन बंब आणि कर्मचारी त्वरित रवाना केले. अवघ्या २० मिनिटांत आरसीएफ थळचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आणि वरिष्ठ अग्निशमन अधिकारी विष्णू गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हनिफ कुरेशी, •➤ पान २ वर

सध्या भारनियमन सुरु नाही

राज्य सरकारचा खुलासा

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्याला वीजेबाबत स्वयंपूर्ण करण्यासाठी विभागाने तात्कालिक स्वरूपात करावयाच्या तसेच दीर्घकालीन स्वरूपात करावयाच्या कामांचे धोरण निश्चित करावे, सध्याची वीजेची वाढती मागणी लक्षात घेऊन ८ हजार मे. वॅट औष्णिक वीज निर्मितीचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन तातडीच्या उपाययोजना कराव्यात असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले.



8000 मेगा वॅट औष्णिक वीजनिर्मितीचे उद्दिष्ट ठेऊन

तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश

विजेची वाढती मागणी

राज्यात भारनियमन करावे लागू नये म्हणून करण्यात आलेल्या उपाययोजनांना यश मिळत असल्याचे व मागील ५ दिवसांपासून राज्यात कोणत्याही प्रकारचे भारनियमन करण्यात आलेले नसल्याची माहिती उर्जामंत्री यांनी दिली. एकट्या महाराष्ट्रातच नाही तर देशात वीजेची टंचाई आहे. कोळशाचा अपुरा पुरवठा हे त्यामागचे मुख्य कारण असून इतर १२ राज्यातही कोळशामुळे भारनियमन सुरु आहे.

मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उर्जा विभागाची बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये त्यांनी राज्याची सध्याची वीज निर्मिती, कोळशाचा साठा, वीजेची आजची आणि भविष्यातील मागणी याअनुषंगाने करावयाच्या उपाययोजना याचा आढावा घेतला. राज्यात मागील पाच दिवसापासून कोणत्याही स्वरूपाचे भारनियमन करण्यात आले नाही ही चांगली बाब असून, अशीच परिस्थिती भविष्यातही कायम राहण्यासाठी वीज निर्मिती, कोळसा साठा, आयात कोळसा, वीज खरेदी याचे उत्तम नियोजन करण्यात यावे असे सांगून मुख्यमंत्र्यांनी वीजेसंदर्भात जे निर्णय घेतले जातील त्याच्या अंमलबजावणीचा •➤ पान २ वर

बनावट पत्राचे रहस्य

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी २९ सप्टेंबर २०२० रोजीच्या पत्रानुसार ६ राज्यपाल नामनियुक्त आमदारांच्या नियुक्त्या केल्याची शिफारस मुख्यमंत्र्यांना केल्याच्या बनावट पत्राने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. मात्र राजभवनाने सदर पत्र बनावट असल्याचा खुलासा केला आहे .

१) वीरभद्रेश करबसप्पा बसवंती (सामाजिक) २) रमेश कोकाटे (राजकीय) ३) सतीश घरत (उद्योग) ४) संतोष नाथ (सामाजिक) ५) जगन्नाथ शिवाजी पाटील (सामजिक) ६) मोरेश्वर महादू भोंडवे (राजकीय) अशी ही नावे आहेत. या सर्व नावांचा राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडून त्याचा ठराव राजभवनाकडे पाठविण्यात यावा अशा आशयाचे बनावट पत्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नावे पाठविण्यात आले आहे .

महाविकास आघाडी सरकारने मात्र राज्यपालांकडे काँग्रेसचे सचिन सावंत(सहकार आणि समाजसेवा), मुझफ्फर हुसैन (समाजसेवा), रजनी पाटील, अनिरुद्ध वणकर ,राष्ट्रवादी काँग्रेस - एकनाथ खडसे (सहकार आणि समाजसेवा), राजू शेट्टी (सहकार आणि समाजसेवा),•➤ पान २ वर

ट्रक अपघातात मोटारसायकलस्वार ठार

। पोलादपूर । वार्ताहर ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटामध्ये धामणदिवी गावाच्या हद्दीमध्ये मंगळवारी सकाळी पावणेसात वाजण्याच्या सुमारास अज्ञात चालकाने चुकीच्या बाजूने ओव्हरटेक करून समोरून येणाऱ्या मोटारसायकलस्वारास धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघातानंतर ट्रक घटनास्थळी सोडून चालक पसार झाला आहे. जिल्ह्यातील पोलादपूर ते रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यांच्या सीमावर्ती भागात असलेल्या महामार्ग पोलीस केंद्र, कशेडीच्या हद्दीमध्ये मुंबई-गोवा महामार्ग क्रमांक ६६ वर धामणदेवी गावच्या हद्दीत घाटामध्ये आज मंगळवार दि.१९ एप्रिल२०२२ रोजी सकाळी पावणेसात वाजण्याच्या दरम्यान तळोजा ते लोटे जाणारा ट्रक क्रमांक एमएच ०४ डीके ७२५८ वरील अज्ञात चालकाने ओव्हरटेक करून रॉंग साईडला जाऊन समोरून पेढांबे चिपळूण ते मुंबइकडे मोटर सायकल एमएच-०८-एव्ही-३७२६ घेऊन जाणारा मोटारसायकलस्वार अथर्व मोहन सावंत (वय-२५ वर्षे, रा.पेढांबे, ता. चिपळूण, जि.रत्नागिरी) यांच्या मोटरसायकलला जोरदार ठोकर देऊन अपघात केला. या अपघातामध्ये मोटारसायकलस्वार अथर्व मोहन सावंत याचा जागीच मृत्यू झाला. अपघातस्थळी पोलादपूर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी आले असून त्यांनी पंचनामा करून मृतदेह ग्रामीण रुग्णालय पोलादपूर या ठिकाणी पाठविला. अपघात झाल्यानंतर ट्रकचालक ट्रक अपघातस्थळी पळून गेला असून अपघातस्थळी एकेरी वाहतूक सुरळीत सुरू करण्यात आली. कशेडी टॅप पोलीस ठाण्याचे पीएसआय चांदणे यांनी याकामी तातडीने प्रयत्न केले.

हापूसची आवक वाढली

। मुंबई । वृत्तसंस्था ।

बदलते हवामान आणि रोगामुळे संकटात सापडलेल्या हापूस आंब्याला यंदाच्या हंगामात चांगलाच फटका बसला, परंतु या अस्मानी संकटातून सावरलेल्या हापूसची आवक सुरू झाली आहे. वाशीतील एपीएमसी मार्केटमध्ये यावर्षीच्या हंगामातील सर्वाधिक आंब्याची आवक झाली. दिवसभरात तब्बल ४५ हजारांपेक्षा जास्त पेट्या एकाच दिवशी बाजारात दाखल झाल्या. त्यामुळे आंब्याच्या दरात काहीसा परिणाम होऊन हापूस आंब्याला ४०० ते १२०० रुपये प्रतिडझन इतका भाव मिळाला.

पक्षवाढीसाठी नाच-गाण्याचे कार्यक्रम

पदाधिकाऱ्यांची नवीन शक्कल

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

पक्ष वाढीसाठी विविध राजकीय पक्ष आपल्या युक्तीनुसार अनेक लोकोपयोगी कार्यक्रम आयोजित करत असतात श्रीवर्धन शहर शिवसेना संघटनेने मात्र नवीनच शकलं लढवलेली दिसत आहे. संघटना वाढीच्या दृष्टीने 'आती रहेगी बहारे' या संघीत मैफिल थोडक्यात ऑर्केस्ट्राचे आयोजन केले आहे. अटकेपार झेंडा फडकवणारे महापराक्रमी श्रीमंत बाजीराव पेशवे मंदिर येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्यात महाविकास आघाडी सरकार प्रस्थापित झाल्यापासून मुख्यमंत्री शिवसेनेचे आसताना देखील श्रीवर्धन शहरात शिवसेनेच्या माध्यमातून विकास काम झालेली नाहीत. अनेक वर्षे शिवसेना पक्षाकडून निवडून येणारे माजी विरोधीपक्ष नेते अनंत गुरव यांच्या प्रभागात अनेक विकास काम रेंगाळलेली आहेत. अनंत गुरव हे आपल्या समाजकार्यावर व पक्षावर निवडून येतात. म्हणून त्यांचा मतदार संघ जाणून बुजून विकासापासून वंचित ठेवला गेला आहे. त्यांच्या प्रभागात भरीव निधी आणून रखडलेली विकासकाम करण्याचे सोडून निवडणुका तोंडावर आल्यावर पक्षावाढीच्या दृष्टीने संगीत मैफिलीचे आयोजन करण्याची एक वेगळीच शक्कल शहरातील पदाधिकारी यांनी लढवली आहे. अनेक राजकीय पक्ष लोकोपयोगी कार्यक्रम करताना गोर गरीबांना साहित्य वाटप, रुग्णांना फळ वाटप, शालेय विद्यार्थ्यांना शालेय वस्तू वाटप तर काही रक्तदान शिबिर मोफत आरोग्य तपासणी शिबीर इत्यादी कार्यक्रम आयोजित करतात.•➤ पान २ वर

पोलादपूर बसस्थानकात अर्भकाची चोरी

। पोलादपूर । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एस.टी.बस स्थानकात झोपलेल्या महिलेच्या कुशीतून तिच्या बाळाची चोरी अज्ञात व्यक्तीने केल्याने पोलादपूर तालुक्यात खळबळ उडाली आहे. पोलादपूर पोलिसांनी अज्ञात इसमाविरूद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. मुंबई-गोवाराष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या पोलादपूर एस.टी.बस स्थानकामध्ये सडवली आदिवासीवाडीतील सुमन वसंत कोळी (वय ३० वर्षे)ही भंगारगोळा करून उदरनिर्वाह करणारी महिला युवराज वसंत कोळी या आठ महिने वयाच्या बाळासह झोपली असता अज्ञात इसमाने तिचे बाळ तिच्या परवानगीशिवाय पळविल्याची घटना रविवार, दि. १७ एप्रिल २०२२ रोजी रात्री बारा वाजण्यापूर्वी घडली. या घटनेची फिर्याद आई सुमन कोळी हिने सोमवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास केली. याप्रकरणी अंगात हिरव्या रंगाचा टीशर्ट, कमरेला सप्तरंगी दोरा आणि उंची दीड फूट, वर्ण गोरा अशा वर्णनाचा •➤ पान २ वर

पोलिसांकडून भोंग्याचा सर्व्हे

। मुंबई । वृत्तसंस्था ।

मुंबई पोलिसांनी मशिदींवर लावण्यात येणाऱ्या भोग्यांबाबत नुकताच एक सर्व्हे केला. यामध्ये काही महत्वाच्या नोंदी त्यांनी केल्या आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नुकताच भोग्यांच्या आवाजाचा विषय लावून धरला होता. त्यामुळे राज्यासह देशभरात याची चर्चा झाली. मुंबई पोलिसांतील सुत्रांच्या हवाल्याने एएनआयने याबाबत माहिती आहे. त्यानुसार, मशिदींवर लावण्यात आलेल्या भोंग्याबाबत मुंबई पोलिसांनी नुकतेच एक सर्व्हेक्षण केले.

पालीत फुलला गणेशभक्तीचा मळा

धम्मशील सावंत

। पाली/बेणसे ।

कोरोनाची लाट ओसरल्यानंतर पुन्हा एकदा जनजीवन पूर्वपदावर आलेय. राज्य शासनाने शासन निर्बंध शिथिल केले. धार्मिक स्थळे व मंदिरे दर्शनासाठी खुली केली. अशातच महाराष्ट्रातील अष्टविनायक तीर्थ क्षेत्रापैकी आयएसओ मानांकन प्राप्त प्रख्यात धार्मिक स्थळ असलेल्या पाली शहरात या वर्षातील पहिल्या अंगारक संकष्टी चतुर्थीला मंगळवारी (ता.१९) बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी हजारो भाविक पहाटेपासून दाखल झाले होते.

अंगारक संकष्टी चतुर्थीला भाविकांच्या रांगा

त्यामुळे मंदिर परिसराला जणूकाही यात्रेचे स्वरूप आले होते. हे बाप्पा बल्लाळेश्वरा सर्वांना सुखी ठेव, कोरोनाला दूर ठेव. अशी आर्त विनवणी भाविक भक्तगणांनी गणरायाला केली असल्याचे अनेक भाविकांनी यावेळी सांगितले. रायगड जिल्ह्यासह मुंबई, •➤ पान २ वर

देवस्थान ट्रस्टने भाविकांसाठी विशेष सोयीसुविधा उपलब्ध केल्या आहेत. देवस्थानचे दोन भक्त निवास नाममात्र दरात भाविकांसाठी उपलब्ध केले आहेत. बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी आरोचे शुद्ध थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. रांगेत उभे राहण्यासाठी रेलींग, मांडव व शेड उभारण्यात आली आहे.

–जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० एप्रिल

१) श्री.वासुदेव रामा म्हात्रे
साईसंगम सी,बी.विंग मु.गोंधळपाडा, पो. वेश्री
२० एप्रिल १९३५

२) श्री. मोहन गणेश शेंड्ये
रमाई गोधळे आळी, व्यायामशाळा-गल्ली, अलिबाग
२० एप्रिल १९५२

पनवेल अग्निशमन विभाग सक्षम होणार

नवीन वाहने खरेदी करण्यास महासभेची मंजुरी

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभाग अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने झालेल्या महासभेत अग्निशमन विभागसाठी पाच वाहने नव्याने खरेदी करण्याच्या विषयास महासभेने मंजूरी दिली. महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे (१९ एप्रिल) महासभा घेण्यात आली. यावेळी सीताताई पाटील, आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, तिलकराज खापर्डे, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

एकूण ११० चौ.कि.मी. इतके कार्यक्षेत्र असलेल्या पनवेल महानगरपालिका अग्निशमन विभागामार्फत नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे बचावकार्य करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान असलेले फायर फायटींग वाहने असणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या पनवेल महानगरपालिका

क्षेत्रामध्ये विविध वापराच्या उत्तुंग इमारती शॉपिंग मॉल्स, व्यावसायिक, शैक्षणिक वापराच्या इमारती अस्तित्वात असून महाराष्ट्र शासनाने नव्याने मंजुरी दिलेला UDCPR या मुळे देखील किमान १० मजल्यापेक्षा उत्तुंग इमारती उभ्या राहत आहेत. या व्यतिरिक्त या क्षेत्रामध्ये आंतराष्ट्रीय विमानतळ, रेल्वे, मेट्रो रेल्वे, व्यवसायिक हब असे नवे प्रकल्पांचे निर्माण कार्य प्रगती पथावर आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेचा अग्निशमन विभाग अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने ॲडव्हान्स फायर इंजिन, रॅपिड इंटरवेन्शन व्हेईकल, मल्टीपर्पज टर्न टेबल लॅडर,वॉटर बाऊजर (१८ किलो लीटर), ॲडव्हान्सव रेस्क्यु टेंडर अशी विविध आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त पाच नवी वाहने खरेदी करण्याचा प्रस्ताव आज महासभेत मंजूर करण्यात आला. पूर्वाश्रमीच्या पनवेल नगर परिषदेमार्फत ६ वाणिज्य संकुलातील ३० वर्षांच्या कालावधीकरिता लिजवर भाडेतत्वावर देणेत आलेले गाळे लिज करारनामा करणेकामी तसेच हस्तांतरीत करारनामा करण्याचा विषय स्थगित करण्यात आला.

कोव्हिड १९ काळात कर्तव्य बजावतांना कोविडमुळे मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांना प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत विमा कवच किंवा सानुग्रह सहाय्य लागू करण्याबाबतचे निर्देश शासनाकडून आले होते. त्यानुसार पनवेल महानगरपालिकेचे कोव्हिड १९ काळात कर्तव्य बजावतांना कोव्हिडमुळे मृत्यु पावलेल्या राजेश बागडे, लक्ष्मी गायकवाड आणि गणपत पाटील यांच्या वारसांना प्रत्येकी पन्नास लाखाच्या धनादेशाचे वाटप डॉ. चौतमोल, विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, हर्षदा उपाध्याय यांच्या हस्ते करण्यात आले.

हिंदू-भंडारी संस्थेकडून आरोग्य तपासणी

। अलिबाग । वार्ताहर ।

भंडारी सेवाभावी संस्थेकडून आरोग्य तपासणी शिबीर रा.जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा, धोकवडे, येथे संपन्न झाला. शिबिराचे उदघाटन सातिर्जे ग्रामपंचायत सरपंच प्राजक्ता प्रसन्न खडपे यांच्या हस्ते झाले. आरोग्य शिबिरात १५० जणांची तपासणी झाली. तसेच त्यांना औषधे व गोळ्या देण्यात आल्या. शिबिरासाठी बालरोगतज्ज्ञ डॉ. विनायक पाटील, डॉ. राजेंद्र चांदोरकर, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. राहुल म्हात्रे, दंतचिकित्सक डॉ. अक्षय कोळी, डॉ. नीरज कोळी, नॅचरोप्याथी डॉ. प्रज्योत पाटील, जनरल फिजिशियन डॉ. प्रणाली पाटील, स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. स्मिता चांदोरकर, त्वचारोग तज्ज्ञ डॉ. निशिगंधा म्हात्रे, डॉ. शाहिदा अन्सारी, डॉ. साहिल सतीश म्हात्रे तज्ज्ञ डॉक्टर्स आरोग्य शिबिरात उपस्थित होते.

यावेळी दिनेश माळवी, संतोष कनगुटकर, तोडणकर गुरुजी, राजन नार्वेकर, प्रशांत नार्वेकर, महेश कुनूमल, कांचन नार्वेकर, जयंत चेऊलकर, तुकाराम शिळदणकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद टेंबुलकर यांनी केले. तर प्रणाली पाटील, तुकाराम तोडणकर, सचिन खोत यांनी मोलाची कामगिरी केली.

न्हावा गावदेवीची यात्रा संपन्न

। उरण । वार्ताहर ।

जे.एन.पी.टी बंदर घारापुरी (एलिफंटा लेणी) यांच्यामधील न्हावा नावाचे गाव आहे. न्हावा गावामधील मंदिर महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे. या गावातील गावदेवीची यात्रा चैत्र १७ व १८ एप्रिल या दोन दिवसात मोठ्या उत्साहात संपन्न झाली. कोरोना नंतर प्रथमच धूमधडाक्यात व भक्तीपूर्ण वातावरणात सर्व भक्तांनी देवीचे मनोभावे दर्शन घेतले. गावामधील ग्रामस्थांनी जत्रेची तयारी केली होती. सरपंच-हरिचंद्र म्हात्रे, शैलेश विठ्ठल पाटील, जयेंद्र पाटील, सुरेश म्हात्रे तसेच इत्यादी पदाधिकऱ्यांनी विशेष मेहनत घेतली आहे. तसेच पालखी सोहळ्यांसाठी मुंबई, ठाणे व पनवेल तसेच उरण तालुक्यातील आगरी-कोळी बांधवाची मोठ्या संख्येने उपस्थित राहीले होते.

मजगांवात शाळा पूर्वतयारी मेळावा

। कोर्लई । वार्ताहर ।

रायगड जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पनवेल व मुरुड तालुका पंचायत समितीच्या शिक्षण विभागातर्फे मजगांव येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शाळा प्रवेश पुर्व तयारी मेळावा संपन्न झाला. सदर प्रसंगी शाळेत दाखल पात्र सर्व विद्यार्थी व त्यांचे पालकही उपस्थित होते.

सर्व प्रथम प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निखिल मानाजी यांचे हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी पल्लवी भोईर यांनी मार्गदर्शन केले. मजगांव प्राथमिक शाळेला सेमी इंग्लिशसाठी शासनाकडून मान्यता मिळाली असून शाळा आय.एस.ओ.मानांकन होण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे मानाजी यांनी सांगितले. तसेच शाळेत प्रॉजेक्टर, कॉम्प्युटर व अन्य शैक्षणिक साहित्य विषयक मार्गदर्शनपर माहिती दिली.

त्यानंतर नाव नोंदणी व इतर स्टॉलला उपस्थित पाहुणे विद्यार्थी व पालक यांनी भेट दिली.

गाळ काढण्याचे अभियान १० मे पर्यंत संपणार

। चिपळूण । वार्ताहर ।

शिवनदीतील गाळ काढणे व सध्या नदीतील साठवून ठेवलेला गाळ उचलण्याचे काम येत्या १० मे पर्यंत संपुष्टात येईल असे आश्वासन नामकडून पार पडलेल्या बैठकीत देण्यात आले. चिपळूण बचाव समिती, नाम व जलसंपदा विभागाची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे घेण्यात आले. सदरचा गाळ हा शासकीय जागेवर टाकण्याचे ठरवण्यात आले. प्रांताधिकारी प्रवीण पवार यांनी आयटीआयची जागा सुचवली आहे त्या ठिकाणी उद्यापासून गाळ टाकण्याचे निश्चित करण्यात आले. नामकडून यासाठी आणखी काही अतिरिक्त यंत्रणा लावण्यात येणार आहे अशी माहिती मल्हार पाटेकर यांनी तसे आपण वेळ पडल्यास वाशिष्ठीसाठीही यंत्रणा देवून सहकार्य करू असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी वाशिष्ठीत काही जास्त मशनरी लावण्याचे सुचित करण्यात आले.त्याप्रमाणे जलसंपदाचे कार्यकारी अभियंता पाटील यांनी ते मान्य करून तिथेही अधिक वेगाने काम केले जाईल असे स्पष्ट केले. याशिवाय उक्ताडमध्ये देते हे जलसंपदा विभाग नाम बरोबर काम करेल असेही ठरवण्यात आले. शिवनदीतील गाळ काढणे व सध्या असलेला गाळ लवकरात लवकर बाहेर नेणे या गोष्टीला प्राधान्य देण्यात यावे असे सुचविण्यात आले व सर्वांनी या गोष्टीला एकमताने मान्यता दिली. त्याप्रमाणे आता शिवनदीचे सीमांकन झाल्यामुळे तसेच डिझेलच्या पुरवठाबाबत विषय निकालात निघाल्यामुळे नामकडून आता अधिक वेगाने काम सुरू करण्यात येईल. या बैठकीला चिपळूण बचाव समितीचे शिरीष काटकर, सतीश कदम, किशोर रेडीज व महेंद्र कासेकर जगदीश पाटील, खोत,सिद्धार्थ साठ्ये व नामचे मल्हार पाटेकर, गणेश थोरात, अभिलारष कोकरे, शहानवाज शहा,समीर जानवलकर आदी उपस्थित होते

'नाळ महाराष्ट्र संस्कृती'शी कार्यक्रमाचे आयोजन

। माणगाव । वार्ताहर ।

नाळ महाराष्ट्राशी, संस्कृतीशी, विद्यार्थी भारती संघटना घेऊन येत आहे. महाराष्ट्र दिनानिमित्त नाळ महाराष्ट्राशी.संस्कृतीशी हा कार्यक्रम १ मे रोजी संध्याकाळी ५ ते ९ या वेळेत माणगाव तालुक्यातील रसिक मेहता कंपाउंट,निजामपूर बस स्थानकासमोर हा कार्यक्रम होणार आहे, असे राष्ट्रीय विद्यार्थी अध्यक्ष तेजस भोसले ह्यांनी सांगितले.

वैभव संपन्न असलेल्या महाराष्ट्राच्या वैविध्याचे सांस्कृतिक दर्शन घडवून आणत लोप पावत चाललेल्या कलांना उजाळा देत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे पूर्णजीवन करण्याचा निर्मळ प्रयत्न म्हणजेच,नाळ महाराष्ट्राशी संस्कृतीशी असे संघटनेच्या राज्यकार्यध्यक्ष साक्षी भोईर यांनी सांगितले. गार्गी लावणी सम्राट थेट नागपूर हुन आपल्या नृत्य आविष्काराने महाराष्ट्राची संस्कृती ढोलकीच्या तालावर आणि त्याच्या अदाकारी ठेक्यावर सादर करण्यासाठी येत आहे.त्याचबरोबर नृत्य दिग्दर्शक सदानंद राणे तसेच लोकशाहीर दत्ताराम मात्रे कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. लावणी, कोळीगीत, दिंडी नृत्य, वाघ्या, मुरळी, धनगरी, राजा, तारपा, चेऊळी, जाखडी नृत्य,बांगडी नृत्य, दशावतार अशा अनेक नृत्यप्रकारांचे सादरीकरण बघायला मिळणार आहे, असे चिरंजीवी संघटनेच्या राज्याध्यक्ष नेहा भोसले यांनी सांगितले.

ज्ञानगंगाचे प्रकाशन

। खरोशी । वार्ताहर ।

जिल्हा खासगी प्राथमिक शाळा कर्मचारी संघटनेच्या प्रथम वर्धापन दिनाचे औचित्य साधून ज्ञानगंगा या विशेष अंकाचे प्रकाशन माजी शिक्षण उपसंचालक व्ही. एस.म्हात्रे, माजी प्राचार्य के.डी. म्हात्रे, व संघटनेचे अध्यक्ष संदीप कदम विशेषांक संपादक धनाजी घरत आदी मान्यवरांच्या हस्ते १७ एप्रिल रोजी कळंबोली येथे करण्यात आहे. संघटनेचे अध्यक्ष संदीप कदम यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी कार्याध्यक्ष साईनाथ गावंड, सरचिटणीस यशवंत मोकल, उपाध्यक्ष सुधाकर जैवल, सौ. मिनाक्षी कर्वे, कोषाध्यक्ष संतोष बारी, स्मरणिकेचे संपादक धनाजी घरत, सल्लागार विकास मांढरे दिपक सुर्यवंशी, आदी शिक्षक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लक्ष्मीनगर सामाजिक, सांस्कृतिक मंडळाचा

गुरुवर्य सुभानराव राणे पुरस्काराने गौरव

। भाकरवड । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील आंबेपूर-पेझारी येथील श्रीपंत भक्त मंडळ संचलित, गुरुवर्य सुभानराव राणे प्रतिष्ठान तर्फे गुरुवर्य सुभानराव तथा अण्णा राणे यांच्या ४० व्या पुण्यतिथी निमित्त मंगळवार दि.१९ एप्रिल २०२२रोजी भव्यसन्मान सोहळा २०२२ चे श्री दत्त मंदीर पेझारी येथे आयोजन करण्यात आले. सदर सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणा-या व्यक्तींचा आणि सामाजिक संस्थाना सन्मानित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रात सर्वोत्तम उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल लक्ष्मी नगर सामाजिक आणि सांस्कृतिक मंडळ आंबेपूर पेझारी या सस्थेला मान्यवरांच्या

हस्ते गुरूवर्य सुभानराव राणे सन्मान पुरस्काराने गौरवण्यात आले.

लोकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले होते. महाड येथील गरजू पूरग्रस्तांना प्रत्यक्ष जाऊन मोठ्या प्रमाणात जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. लायन्स क्लब पोयनाड यांचे सोबतीने रक्तदान उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. असे अनेक विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. मंडळाचे अध्यक्ष लिलाधर धुमाळ आणि मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि महिला मंडळातील सर्व महिला अतिशय हिरिरीने सहभागी होऊन सामाजिक कार्यात सामाजिक बांधिलकी जपत आहेत. सदर सोहळ्यात रा.जि.प सदस्य तथा झेप फाऊंडेशनच्याअध्यक्ष चित्रा पाटील, श्री पंत भक्त मंडळ पेझारीचे अध्यक्ष दिगंबर सुभानराव राणे, शहाबाजकर बुवा, कारेकर बुवा, पंत बाळेकुंद्री महाराज सांप्रदायातील अध्यात्मिक वारसा असलेले भक्त मंडळी उपस्थित होते.

कर्नाटक लोककला महोत्सवात 'नाखवा माझा दर्याचा राजा'ची हॅट्ट्रिक

। उरण । वार्ताहर ।

कर्नाटक येथे ९ ते ११ एप्रिल २०२२ मध्ये साजरा झालेल्या लोककला महोत्सव-२२ मध्ये पुन्हा एकदा बेस्ट परफॉर्मन्स हा प्रथम क्रमांकाचा किताब मिळवून हॅट्ट्रिक साधून उरण तालुक्यातील भेंडखळ गावातील दत्ता भोईर आणि त्यांच्या समुहाने महाराष्ट्र राज्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

भेंडखळ गावाचे दत्ता भोईर आणि त्यांच्या कलाकार समूहांला या महोत्सवात कोळी व लावणी ही लोककला सादर करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी देण्यात आली होती. या स्पर्धेत संपूर्ण देशांतून २५ राज्यांनी सहभाग घेतला होता. कर्नाटक उडपी येथे दक्षीण कन्नडा मोगवीरा महासंघ उडपी यांच्या वतीने महालक्ष्मी उत्सव इंटर झोनल लोककला महोत्सव-२०२२ आयोजित करण्यात आला होता.

भारतामधून २५ राज्यानी

या महोत्सवात सहभाग घेतला होता. महाराष्ट्राच्या वतीने नाखवा माझा दर्याचा राजा या कार्यकमांतर्गत कोळी व लावणी नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले होते. बेस्ट परफॉर्मन्स हा प्रथम क्रमांकाचा किताब नाखवा माझा दर्याचा समुहाने मिळवून हॅट्ट्रिक साधली आहे.

जाहिर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत हि तिचे विद्यमान मालक (१) श्री.सुर्यकांत हिराजी भगत, रा.सर्व्हे नं.२६/३/४ निसर्ग बंगला, वैभव नगर विद्यानगर, ता.अलिबाग, जि-रायगड, ४०२२०१ (२) श्री.भागवत दत्तात्रय गुंड, रा.सर्व्हे नं सर्व्हे नं.२६/३/४ किनारा बंगला, वैभव नगर विद्यानगर, ता.अलिबाग, जि-रायगड-४०२२०१, (३) मयत राजेंद्र बाजीराव खोत तर्फे कायदेशीर वारस असे (अ)प्रशांत राजेंद्र खोत (ब) विश्वास राजेंद्र खोत, (क) प्रियांका राजेंद्र खोत, (ड) आयोध्या राजेंद्र खोत, रा.सर्व्हे नं.सर्व्हे नं.२६/३/४ किनारा बंगला, वैभव नगर विद्यानगर, ता.अलिबाग, जि-रायगड-४०२२०१ यांची स्वकष्टार्जित मालकीची व ताबे वहिवाटीची असून, सदर मिळकत ही विद्यमान मालकांनी दिनांक २८/०६/२००० ह्या दिवशी अलिबाग येथे दस्त क्र.१२२३/२००० अन्वय खरेदीखताने श्री. प्रेमनाथ चोप्राचे कु.मु.धारक अखत्यारी दिपक गंगाभिषणदास बजाज यांच्या कडून खरेदी घेतली होती. सदर दस्ताची मूळ प्रत विद्यमान मालक यांच्याकडून गहाळ झाली असून योग्य तो शोध घेतला असता ती आढळून आली नाही. तरी दस्ताची मूळप्रत कोणालाही सापडून आल्यास त्याचा गैरवपर न करता खालील पत्त्यावर आणून द्यावी. तरी आज पासून पुढील ७ दिवसांमध्ये सदर मूळ परत न सापडल्यास, सदर मूळ प्रतीचा वापर करून व्यवहार केल्यास त्याची बांधलीकी विद्यमान मालकावर राहणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

अ) मिळकतीचे वर्णनः-जिल्हा रायगड ता.अलिबाग गाव चेंढरे, तसेच महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे चेंढरे, हद्दीतील मिळकत सर्व्हे नं.२६/३+२६/१+३+६ प्लॉट नं.४ यांसी क्षेत्र ४५८.९५ चौ.मी.यापैकी उत्तरेकडील २२९.४५ चौ.मी.नं.१ सुर्यकांत हिराजी भगत यांना वरील जागे पैकी दक्षिणेकडील भागातील ११४.७५ चौ.मी.नं.२ भागवत दत्तात्रय गुंड यांना वरील पैकी दक्षिणेकडील उर्वरित ११४.७५ चौ.मी.नं.३ राजेंद्र बाजीराव खोत यांनी सदर मिळकत खरेदी घेतली आहे यांसी चतुःसीमा येणेप्रमाणे खालीलप्रमाणेः-

पूर्वेस :- सर्व्हे नं.४७ श्री.बावकर यांची जागा
पश्चिमेस :- वरील सर्व्हे नं, हि.नं.मधून जाणारा अंतर्गत रस्ता
दक्षिणेस :- वरील सर्व्हे नं.हिस्सा नं.पैकी प्लॉट नं.०५ ची जागा
उत्तरेस :- वरील सर्व्हे नं.हिस्सा न.पैकी प्लॉट नं.०३ ची जागा

ठिकाणः अलिबाग
दिनांकः२०/०४/२०२२

वकील गीतांजली भागवत गुंड
सर्व्हे नं.सर्व्हे नं.२६/३/४ किनारा बंगला,वैभव नगर, विद्यानगर, ता.अलिबाग,जि-रायगड ४०२२०१
मोबाईल नं.७९७२६२९५१३

पान १ वरुन

रिलायन्सच्या गॅस स्टेशननजीक आग

हरिश्चंद्र बावकर, तुषार कवळे, विशाल मंडलिक, अतुल ठाकूर या अग्निशमन जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून अंदाजे २ ते ३ एकर जमिनीवर पसरलेल्या आगीवर नियंत्रण मिळविले. दरम्यान, रिलायन्सचा बंब घटनास्थळी दाखल झाला आणि आग पूर्णत: विझविण्यात आली.

रिलायन्स कंपनीला गॅस पुरवठा करणाऱ्या पाइपलाईन्स आणि वाल्व स्टेशनजवळच असल्याने ही आग पसरू न देणे गरजेचे होते. आरसीएफ थळच्या अग्निशमन दल जवानांच्या तत्पर आणि शर्थीच्या प्रयत्नांमुळे मोठी दुर्घटना टळली.

बनावट पत्राचे रहस्य

प्रा. यशपाल भिंगे (साहित्यिक) आनंद शिंदे (कला) शिवसेना - उर्मिला मातोंडकर (कला), नितीन बानगुडे-पाटील(साहित्यिक), विजय करंजकर आणि चंद्रकांत रघुवंशी आदी नावांची शिफारस विधान परिषदेच्या राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या रिक्त झालेल्या जागेवर लवकरात लवकर नियुक्ती करावी अशी मागणी वारंवार महाविकास आघाडीचे नेते करत आहेत. ६ नोव्हेंबर २०२० रोजी राज्य सरकारने राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांना १२ जणांच्या यादीचे पत्र पाठवले होते . मात्र राज्यपालांकडून त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. म्हणून राज्यपाल विरुद्ध राज्यसरकार असा वाद उभा ठाकला आहे. महाविकास आघाडी सरकारच्या नेत्यांचे शिष्टमंडळ १२ आमदारांच्या नियुक्तीसाठी वेळोवेळी राज्यपालांना भेटत आहेत. मात्र अद्याप मंत्रिमंडळाने शिफारस केलेल्या नावांना राज्यपालांनी अद्याप मंजुरी दिली नाही.

सध्या भारनियमन सुरु नाही

आपण दर आठवड्याला आढावा घेणार असून घेण्यात आलेल्या निर्णयांचा कार्यपूर्ती अहवाल या बैठकीत सादर करण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली. केंद्र शासनाने १० टक्के कोळसा आयातीला मान्यता दिली आहे, ही प्रक्रिया गतीने पूर्णत्वाला न्यावी असे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, येणारा पावसाळा लक्षात घेऊन कोळशाच्या साठ्याचे नियोजन करण्यात यावे. राज्याचा हक्काचा आणि दर्जेदार कोळसा राज्याला नियमितपणे उपलब्ध होईल यादृष्टीने महानिर्मितीने सातत्यपूर्ण पाठपुरावा करावा. उरण येथील गॅस प्रकल्प सुरु करण्यासाठी केंद्रीय पेट्रोलियम मंत्र्यांशी तसेच पंतप्रधानांशी आपण स्वत: बोलू असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.बैठकीस उर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, ऊर्जा राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, मुख्यसचिव मनुकुमार श्रीवास्तव, सीताराम कुंटे, आशिषकुमार सिंह, विकास खारगे, देबाशिष चक्रवर्ती, दिनेश वाघमारे, विजय सिंघल, संजय खंदारे यांच्यासह विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

पक्षवाढीसाठी नाच-गाण्याचे कार्यक्रम

मात्र नाच गाण्याचा कार्यक्रम सादर करून पक्ष वाढवण्याचा शिवसेनेचा केविलवाणा प्रयत्न येत्या निवडणूक काळात किती पचनी पडणार अशी चर्चा श्रीवर्धन मध्ये होत आहे.

नगरपालिका निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन सत्ताधारी पक्षाला घेरणारे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प असोत आदी विविध मुद्दे आहेत. मात्र हे मुद्दे सोडून स्नेहभोजन, व नाच गाण्याचे कार्यक्रम करण्यात सेनेचे पदाधिकारी व्यस्त आहेत. भ्रष्टाचार व अन्यया विरुद्ध पेटून उठणाऱ्या शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे याच्या शिवसैनिकांची कुठेतरी कमी भासत असल्याची खंत एका ज्येष्ठ शिवसैनिकांनी नाव न छापण्याच्या अटीवर व्यक्त केली आहे.

अर्भकाची चोरी

युवराज वसंत कोळी या मुलाचे अपहरण केल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरूध्द भादंवि ३६३ कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलादपूर पोलीस ठाण्याचे हवालदार संदीप शिरगांवकर हे सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.

पालीत फुलला गणेशभक्तीचा मळा

नवीमुंबई, ठाणे, पुणे, पट्ट्यातून भाविक भक्तगण बाप्पा गणरायाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी मोठ्या भक्तीभावाने दाखल झाल्याचे पहावयास मिळाले. उन्हाळी सुट्या तसेच सलग लागून आलेल्या सुट्ट्या यामुळे गणेशभक्तांनी अष्टविनायक दर्शनाचा बेत आखला. त्यामुळे पालीत अंगारकीला भक्तांचा मळा फुलून निघाला.

दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना उत्तम प्रकारच्या सोयीसुविधा पुरविण्यासाठी बल्लाळेश्वर देवस्थानने नीटनेटके नियोजन केले होते. याठिकाणी विविध प्रकारची दुकाने देखील सजली होती. शिवाय मंदिर परिसरात रानमेवा विक्रीसाठी बसलेल्या आदिवासी बांधवांचा देखील धंदा तेजीत होता. कोरोनानंतर दोन पैसे हाती आल्याने आदिवासी बांधव देखील समाधानी झाल्याचे पहावयास मिळाले.भाविक व स्थानिकांच्या वाहनांमुळे काही ठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती. मात्र वाहतूक पोलीस व देवस्थान ट्रस्टचे सुरक्षा रक्षक वाहतूक कोंडी सोडवीत होते. पाली पोलीस निरीक्षक विश्वजित काईनगडे यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिरात व मंदिर परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे, वैभव आपटे, प्रमोद पावगी,अरुण गद्रे,अमोल साठे आणि डॉ. पिनाकीन कुंटे यांच्या मार्फत भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

वर्षातील पहिली अंगारक संकष्टी चतुर्थी असल्याने मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी आले होते. आम्ही देखील चांगल्या दर्जाच्या वस्तू ग्राहकांना देण्यासाठी सज्ज होतो, अनेकांनी चांगली खरेदी देखील केली. व्यवसाय चांगला झाला.

-प्रेषित साठे,
व्यावसायिक, बल्लाळेश्वर मंदिर

जाहीर नोटीस

या जाहिर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वैजाळी, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) वंदना रामनाथ मोकल, २) अदिनाथ तुळशीदास मोकल, ३) रविना रामनाथ मोकल, ४) सुनिता गुरूनाथ मोकल यांच्याकडून सर्व हक्कांसहीत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असल्याची खात्री मालकानी दिलेली आहे.

मिळकतीचे वर्णन

अ.क्र.	मौजे	गट क्र.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु. पै.)
१	वैजाळी ता.अलिबाग	२४४/१	०-३१-१० +ख ०-०३-९० एकूण ०-३५-००	६.१३

वरील मिळकती पैकी ०-३१-०० हे.आर.क्षेत्र सदरच्या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार अगर खरेदी, साठेकरार, दान, पोटगी, वाटप, मृत्यूपत्र, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणताही बोजा अगर हक्क असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत कोणाचीही तक्रार, हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध मालकीची व बोजारहित आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व नंतर येणाऱ्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहाणार नाहीत ही नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांकः१९/०४/२०२२

ॲड.सुजित पां.पाटील
ऑफिस नं.१ शिवराम भास्कर बिल्डींग, बाजारपेठरोड, केळकर नाका, अलिबाग
मो.नं.-९८८१४४५३५२

आपटवणे गावच्या हद्दीत ओहळात

कॅल्शियम, गर्भनिरोधक गोळ्यांचा खच

॥ ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण

॥ आरोग्य यंत्रणेचा निष्काळजीपणा

। सुधागड-पाली । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील आपटवणे गावच्या हद्दीत असलेल्या ओहळात औषध गोळ्यांच्या हजारो पाकिटांचा खच टाकण्यात आला आहे. मंगळवारी (ता. १९) येथील सरपंच शरद चोरघे आणि ग्रामस्थांनी ही बाब निदर्शनास आणली आहे. आरोग्य यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.

ग्रामीण भागात रुग्णांवर उपचारासाठी सरकारमार्फत शासकीय रुग्णालयांना पुरविण्यात आलेल्या कॅल्शियम व गर्भनिरोधक गोळ्यांची ही पाकिटे आहेत. त्यांची योग्य विल्हेवाट न लावता अशा प्रकारे निष्काळजीपणे फेकून दिलेली आहेत. लहान मुले व जनावरे यांनी हे औषधे खाल्ल्यास त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. शिवाय, येथील पर्यावरणाला देखील हानी पोहोचू शकते. मागील वर्षी अशाच प्रकारे गाठेमाळ आदिवासी वाडीजवळ मुदत न संपलेल्या आयरन अँड फॉलिक ॲसिड सिरपच्या बाटल्या फेकण्यात आल्या होत्या.

> याबाबत अहवाल मागवून चौकशी केली जाईल. जो कोणी दोषी आढळेल, त्यांच्यावर कारवाई केली जाईल.
> – डॉ. शशिकांत मढवी, तालुका आरोग्य अधिकारी, सुधागड

> एवढ्या मोठ्या प्रमाणात अशा प्रकारे औषधे टाकून देणे योग्य नाही. आरोग्य विभागाने औषधे गरजूंना देणे आवश्यक होते किंवा शास्त्रीय पद्धतीने त्यांची विल्हेवाट लावणे अपेक्षित होते. या प्रकरणाबाबत जे कोणी दोषी असतील, त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.
> – शरद चोरघे, सरपंच, आपटवणे

'मुंबई-गोवा'चे नाव 'स्वराज्य' करावे

। महाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात असून, या महामार्गाला छ. शिवाजी महाराज यांच्या 'स्वराज्य' राष्ट्रीय महामार्ग असे नामांतर करावे, अशी मागणी भाजपचे तालुका सरचिटणीस महेश शिंदे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि ज्योतिरादित्य शिंदे यांच्याकडे केली आहे. तसेच महाड-मढेघाट-वेल्हे-पाबेघाट-खानापूर मार्गे पुणे या मार्गाला पर्यटन महामार्ग म्हणून विकसित करावे, अशी मागणी देखील केली आहे.

निडी शाळेत शाळा पूर्वतयारी मेळावा

नागोठणे : कोरोनाच्या जागतिक महामारीमुळे गेली दोन वर्षे अंगणवाडी भरु न शकल्याने चालू शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिलीमध्ये दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांना भविष्यात लेखन व वाचनाचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी विद्यार्थ्यांची शाळा पूर्वतयारी करून घेणे गरजेचे आहे. या अनुषंगाने राजिप प्राथमिक शाळा निडी तर्फे नागोठणे येथे कोंडगाव ग्रामपंचायत माजी सरपंच विद्यमान सदस्य शेकापचे युवा नेते निखिल मढवी यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळा पूर्वतयारी मेळावा सोमवार, दि. १८ एप्रिलला घेण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक संघ, शिक्षक-पालक संघ व ग्रामस्थ उपस्थित होते.

आंबेडकर जयंतीनिमित्त रसायनीत मिरवणूक

रसायनी : रसायनी परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्सव रसायनी परिसरात ठिकठिकाणी मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समितीतर्फे बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तर दि. १६ रोजी आणि परिसरात महा मिरवणुकीचे आयोजन वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष आशिष जाधव यांनी केले होते. या मिरवणुकीला निळ वादळ ग्रुप वावेघर. युवा आदर्श मंडळ नवीन पोसरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन समिती सम्यक सामाजिक संस्था भारतीय बौद्ध महासभा बामसेफ व परिसरातील भीमसैनिक. सामाजिक संघटनेनेच्या कार्यकर्त्यांनी या मिरवणुकीत सहभाग घेतला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

'खराब विद्युत मीटर त्वरित बदला'

पनवेल : खराब झालेले विद्युत मीटर त्वरित बदलून देण्याची शिवसेनेची मागणी कामोठे शिवसेनेच्या वतीने वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे करण्यात आली. कामोठे शिवसेना शहर प्रमुख राकेश गोवारी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभाग प्रमुख सचिन त्रिमुखे , संजय जंगम यांनी संबधीत अधिकारांची भेट घेऊन सिडको अधिकारामध्ये असलेल्या कामोठे शहरात कार्यकारी अभियंता सिडको कामोठे या विभागात मीटर साठा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकाना मीटर बाहेरून जास्त किमतीत विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे लवकरात लवकर मीटर कार्यकारी अभियंता सिडको विभाग इथे उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी अतिरिक्त कार्यकारी अभियंता सिडको विभाग करण्यात आली.

भारतीय श्रमिक शक्ती संघटना कार्यरत

नागोठणे : रिलायन्स इंडस्ट्रीजच्या नागोठणे युनिटमध्ये भारतीय श्रमिक शक्ती संघ ही नवीन कामगार संघटना कार्यरत करण्यात आली आहे. या कामगार संघटनेची प्रक्रिया संघटनेच्या मुख्य कार्यालयातून पूर्ण झाल्याने त्यासंबंधीचे एक पत्र या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून रिलायन्सच्या नागोठणे युनिटचे अध्यक्ष शशांक गोयल, एच.आर. विभागाचे वरिष्ठ अधिकारी मुखर्जी, श्रीकांत गोडबोले, विनय किर्लोस्कर व उदय दिवेकर यांना सोमवारी देण्यात आले. यावेळी भारतीय श्रमिक शक्ती संघ या संघटनेचे युनिट अध्यक्ष निलेश नाईक, कार्याध्यक्ष अशोक भोय, उपाध्यक्ष प्रवीण दबडे, चंद्रकांत अडसुळे, मनोज पेडवी, किशोर शिर्के, जनरल सेक्रेटरी प्रमोद मोरे, सचिव शांताराम भोई, सहसचिव विनोद गोरे, दिनेश शिर्के, सुरेश कुथे, खजिनदार मोहन भोय, कार्यकारिणी सदस्य संदेश अडसुळे, निलेश म्हात्रे यावेळी उपस्थित होते.

द महाराष्ट्र उद्योग वेब पोर्टलचे अनावरण

उरण : दक्षिण मुंबईतील प्रेस क्लब येथे मंगळवार, दि. १९ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता द महाराष्ट्र उद्योग या वेब पोर्टलचा उद्घाटन सोहळा पार पडला. हा सोहळा मुंबई व्यापारी संघटनाचे अध्यक्ष आणि द महाराष्ट्र उद्योगचे संस्थापक अनिल फोंडेकर यांनी आयोजित केला होता. या सोहळ्याला झी २४ तासचे संपादक निलेश खरे आणि आर्थिक सल्लागार प्रकाश पागे हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. द महाराष्ट्र रोजगार, अवनि लघुउद्योग व्हॅन आणि नोकरी व उद्योग मेळाव्यांच्या माध्यमातून अनेक लोकांना फोंडेकर हे स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी मदत करत आहेत. सध्या महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या विविध जिल्ह्यामध्ये १०७ अवनि लघुउद्योग व्हॅन जोमाने सुरू आहेत. नव उद्योजकांना अधिक माहिती मिळावी, यासाठी http://www.themaharashtraudyog.com या मराठी उद्योजकांच्या हक्काच्या व्यवसायिक व्यासपीठाचा शुभारंभ करण्यात आला आहे. मराठी उद्योजकांनी पुढे यावे म्हणून, त्यांची मानसिकता बदलावी, यासाठी अनिल फोंडेकर रोजगार स्वयंरोजगारचे काम करत आहेत.

म ह त्त्वा चे

गॅस हाताळणीबाबत जनजागृती

उरण : गॅस हाताळणी कशी करायची याबाबत योग्य ती माहिती उरण तालुक्यातील पिरकोन गावात प्रतीक्षा म्हात्रे (सूर्या गॅस कंपनी कर्मचारी) यांनी दिली. याबाबतचे प्रात्यक्षिक भाजप तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांच्या निवासस्थानी नागरिकांना दाखवून याविषयी जनजागृती करण्यात आली. गॅसच्या बाबतीत जे स्फोट होतात, ते रोखण्यासाठी काय उपाययोजना करायला हव्यात, याबाबत त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

'अनधिकृत भोंग्यावर कारवाई करा'

उरण : नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील मशिदींवरील अनधिकृत भोंग्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली आहे. तसे निवेदन मनसे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग यांना दिले आहे. यावेळी संदेश ठाकूर म्हणाले की, उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मशिदीवरील भोंग्यावरती कारवाई होणे अपेक्षित होते, परंतु तशी कारवाई झालेली दिसत नाही.

मोटारसायकल चोर जेरबंद

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल परिसरातून मोटारसायकलसह इतर वाहने चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी गजाआड करून त्याच्याकडून नऊ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

समीर ज्ञानेश्वर पाटील (२६), रा. मु.पो. कोल्ही कोपर, ता. पनवेल यांनी त्यांची ५०,०००/- रुपये किंमतीची यामाहा कंपनीची मोटार सायकल कमांक एम. एच. /४६/ बी.जे./ ९७७४ हि मु. पो. भंगारपाडा, घर नंबर १३४, ता. पनवेल, याठिकाणी पार्क करून ठेवली असत ती कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी करून नेली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तकारीवरून पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.पनवेल शहर पोलीस ठाणे येथील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्ह्यातील आरोपी कौशल श्रीरंग पाटील, रा. पाणदिवे, पो. कोपरोली, जि. रायगड यास पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली असता, चोरीस गेलेली मोटारसायकल तसेच त्याचे चोरी केलेल्या इतर पाच मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत. याकरिता आरोपीने वापरलेला महिंद्रा कंपनीची टेम्पो हस्तगत करण्यात आला. ही पोलीस आयुक्त बी.के. सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

गटाराची काम तातडीने करा

नागरिकांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुड शहरातील जुनी पेठ परिसरात पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी जी गटारे बांधली आहेत, ती जवळ जवळ बुजली आहेत. येथील घरांची उंची रस्त्यालगत असल्याने गटारे बुजली असून, सर्व पाणी येथील रहिवाशांच्या घरात शिरत असल्याने जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान होत आहे. याकडे मुख्याधिकारी यांनी लक्ष देऊन गटाराची काम तातडीने करुन घ्यावीत, अशी मागणी जुनी पेठ येथील नागरिकांनी केली आहे.

सध्या मुरुड नगरपरिषदेला पाच कोटी रुपये शासनाकडून प्राप्त झाल्याने नवीन रस्त्याची कामे जोरात सुरु आहेत. परंतु, या भागातसुद्धा नवीन रस्ते बनवले जात आहेत. नवीन रस्ते बनवल्यामुळे साहजिकच रस्त्यांची उंची वाढणार आहे.त्यामुळे राहत्या घरात पाणी शिरणार आहे. ज्याप्रमाणे रस्ते बांधले, त्याप्रमाणेच या भागातील रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटारांची कामे तातडीने करण्यात यावी तरच येथील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याची कैफियत पेठ मोहल्ल्यातील नागरिकांनी लेखी निवेदनाद्वारे मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्याकडे केली आहे.

सदरील निवेदनाद्वारे पेठ मोहल्ला ते लक्ष्मीखार रस्त्यास गटार लाईनचे काम तातडीने करण्याची विनंती येथील नागरिकांनी केली आहे.

याबाबत आमच्या प्रतिनिधीने मुरुड नगरपरिषदेचे प्रशासक व मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, मुरुड शहरात जेवढे नवीन रस्ते होणार आहेत. त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला गटाराची कामे अंदाजपत्रकात प्रस्तावित आहेत. त्यामुळे नागरिकांनी निर्धास्त राहावे, गटारांची कामेही होणारच आहेत. पेठ मोहल्ला ते लक्ष्मीखार येथेसुद्धा गटारांची कामे होणार असल्याचे यावेळी भुसे यांनी सांगितले आहे.

वरदविनायकाच्या दारात मांदियाळी

अंगारकी चतुर्थीच्या निमित्ताने कण्यांची रांगोळी

। पाताळगंगा । वार्ताहर ।

अष्टविनायकांपैकी असलेले महड गावातील वरदविनायकाचे दर्शन घेण्यासाठी खालापूर, चौक, खोपोली, कर्जत, पनवेल, रसायनी या परिसरातील हजारो भक्तांनी पहाटेपासूनच मंदिरात गर्दी केली होती. अंगारकी चतुर्थीच्या निमित्ताने सुंदर अशी मनमोहक रांगोळी वरदविनायक फुल व कडधान्ये रांगोळी मंडळ यांच्या माध्यमातून काढण्यात आली होती.

या रांगोळीसाठी कपिल पितळे बदलापूर, संतोष भोर, रवींद्र झवरे, रोहित प्रभु- चांभार्ली, वरद पवार-कल्याण, दिलीप पै. पनवेल यांनी अर्थसहाय्य केले. या रांगोळीमध्ये श्रीराम तसेच विठ्ठलाची प्रतिकृती साकारण्यात आली होती. ही रांगोळी रवी आचर्य, मंगेश देशमुख, तुलशिराम ठोंबरे, सचिन पाटील, उत्तम जगदाळे, किशोर म्हात्रे, स्मिता म्हात्रे, अतुल तट्टू, साक्षी देशमुख, स्नेहल देशमुख, श्रेया देशमुख, स्वरा पाटील, जीवन ठोंबरे, भरत ठोंबरे, तन्मय पाटील यांनी साकरलेली होती. यामध्ये तांबडा, नारंगी, पिवळा, हिरवा, जांभळा, निळा, पांढरा लाल आदी रंगांचा वापर करण्यात आला होता. कणी, साबूदाणे, काळे तीळ अशा एकूण १०० किलो वस्तूंचा समावेश करण्यात आला होता.

स्थानिक तक्रार समितीच्या अध्यक्षपदी ॲड. निहा राऊत

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे यांना प्राधिकृत केले आहे. त्यांना या समितीचे जिल्हा अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी घोषित केले आहे. त्यानुसार जिल्हा अधिकारी यांनी जिल्हा स्तरावर स्थानिक तक्रार समिती पुनर्गठित केली आहे. या समितीमधील सदर अधिनियमातील निकषानुसार अध्यक्ष व सदस्य पदासाठी महिला व बाल विकास क्षेत्रात कार्यरत महिलांची नियुक्ती केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी ॲड. निहा अनिस राऊत अलिबाग, त्याचप्रमाणे सदस्यपदी स्वाती चंद्रविलास शेट, पोलादपूर, तपस्वी गोंधळी अलिबाग, जीविता पाटील अलिबाग यांची निवड करण्यात आली आहे. या समितीचे सदस्य सचिव जिल्हा महिला व बाल विकास अधिकार विनीत म्हात्रे आहेत.

पात्रादेवी घाट लहान वाहनांस धोकादायक

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील चिरनेर-खारपाडा रोडवर अवजड कंटेनर ट्रेलर आणि दगडाची खडी, ग्रीट अवजड वाहतूक करणाऱ्या डंपरची संख्या अधिक प्रमाणात वाढली आहे. त्या डंपरमधून ग्रीट, खडी नियमित पडत असल्याने इंद्रायणी डोंगराजवळील पात्रादेवी घाटात वाहनाचा अपघातास कारणीभूत ठरु शकते.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई येथून कोकणाकडे जाण्यारा हा सुलभ मार्ग आहे. या मार्गावर चोवीस तास चाकरमानी व पर्यटकांच्या वाहनांची वर्दळ सुरूच असते. तसेच याच मार्गावरून खडी ग्रिटचे अवजड भरलेली वाहतूक होत आहे. मात्र, ही खडी ग्रिट घाटामध्ये रस्त्यावर सांडत आहे. त्यामुळे छोट्या वाहनांना, विशेष करून मोटारसायकलस्वारांना याचा धोका जास्त प्रमाणात होत आहे. या अगोदर या ठिकाणी मोटारसायकलस्वारांचे अपघात होऊन जीव गमावले आहेत.

अवजड वाहतूक होत असताना मात्र वाहतूक पोलिसांना या चिरनेर-खारपाडा रोडवरील पात्रादेवी घाटातील प्रकाराचा पत्ता नाही, ही शोकांतिका आहे. अवजड वाहतुकीवर पोलिसांनी तात्काळ कारवाई करावी अशी मागणी येथील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

अवजड वाहनांवर कारवाईची नागरिकांची मागणी

> डंपरमधून अवजड वाहतूक होऊन खडी ग्रिट पडून अपघातास कारणीभूत ठरत असेल तर पाहणी करून तात्काळ कारवाई करण्यात जाईल.
> –अशोक गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उरण वाहतूक शाखा

> रस्त्यावर जर अशा प्रकारची अवजड वाहतूक होत असेल, तर आमच्याकडून वाहतूक पोलिसांना लेखी स्वरूपात कसळविण्यात जाईल.
> – नरेश पवार, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उरण

जागतिक वारसादिनी मिनिट्रेनची हेरिटेज रन

। माथेरान । वार्ताहर ।

जागतिक वारसा दिनानिमित्त मध्य रेल्वेच्या मुंबई विभागामार्फत नेरळ-माथेरान रेल्वे मार्गावर तीन बोगी लावलेली आणि वाफेच्या इंजिनवर चालणारी मिनिट्रेन धावली. यावेळी रेल्वेचे वेगवेगळ्या विभागातील अधिकारी उपस्थित होते.

माथेरान हे जागतिक वारसा जपणारे पर्यटनस्थळ आहे. १८५० साली या पर्यटनस्थळाचा शोध लावल्यानंतर शोध लावणारे ठाणे जिल्ह्याचे तत्कालीन कलेक्टर ह्युज मॅलेट यांनी बांधलेला पहिला बंगला आजही दिमाखात उभा आहे. १९१९ मध्ये माथेरानमधील गोरगरीब जनतेच्या उदरनिर्वाहासाठी बांधलेले कपाडिया मार्केट आजही आपली छाप सोडत आहे. ब्रिटिशकालीन हेरिटेज बंगले आजही मनमोहक असल्याचे पहावयास मिळत आहे. यामध्ये पर्यटकांना आकर्षित करणारी माथेरानची मिनिट्रेन ११५ वर्षांनंतर आजही येणाऱ्या पर्यटकांना भुरळ घालत आहे.

सध्या नेरळ-माथेरान रेल्वे बंद असून, अमन लॉज-माथेरान शटल सेवा सुरळीत सुरू आहे. नेरळ-माथेरान रेल्वे मार्गावर स्लीपर बदलण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, पुढील काही महिन्यात हे काम पूर्ण होऊन पावसाळ्यानंतर या मार्गावर ट्रायल घेऊन ती यशस्वी झाल्यानंतर नेरळ-माथेरान रेल्वे सेवा सुरू होईल, अशी आशा येथील स्थानिक नागरिकांसह पर्यटकांनादेखील वाटत आहे.

वाफेच्या इंजिनाची पर्यटकांना भुरळ



> जागतिक वारसा दिनाचे औचित्य साधत नेरळ–माथेरान मार्गावर दोन किलोमीटर अंतरावर एक विस्ताडोम बोगी, एक द्वितीय श्रेणी आणि एक गार्ड बोगी लावून मध्य रेल्वे अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हेरिटेज रन म्हणून धावली. गाडीला आकर्षक सजावट करण्यात आली होती. त्याकाळचे वाफेचे इंजिन आता डिझेलवर धावले गेले.
> – शिवाजी सुतार, मध्य रेल्वे मुख्य जनसंपर्क अधिकारी

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन

पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

संपादकीय

‘स्मार्ट सिटी’चं काय झालं?

मोठमोठ्या घोषणा करायच्या आणि हजार कोटी, लाख कोटी असे आकडे लोकांच्या तोंडावर फेकायचे हे नरेंद्र मोदी सरकारचे वैशिष्ट्य राहिले आहे. स्मार्ट सिटीचा प्रकल्प हा मोदी यांच्या अशाच घोषणांपैकी एक. आता तो गुंडाळण्याची तयारी झाली आहे. एक एप्रिलच्या नंतर या प्रकल्पासाठी कोणतीही नवीन निविदा काढली जाऊ नये असे आदेश महाराष्ट्रातील शहरांच्या आयुक्तांना आले आहेत. देशातील शंभर शहरांना स्मार्ट बनवण्याचा चंग या योजनेत बांधण्यात आला होता. या संदर्भात बिझनेस स्टँडर्डमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तांतानुसार शंभरपैकी केवळ चौदा शहरांमध्ये नियोजित उद्दिष्टाच्या पन्नास टक्के कामे पूर्ण झाली आहेत. याचा अर्थ उरलेल्या ८६ शहरांमधील स्थिती नाव घेण्याजोगी नाही. मोदींचा मतदारसंघ असलेल्या वाराणसीमधील ८७ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. उत्तर प्रदेशातील अन्य पाच शहरांमधील स्थितीदेखील बरी आहे. उत्तर प्रदेश भाजपसाठी राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्वाचा प्रदेश आहे. त्यामुळे सरकारने सर्व लक्ष त्यावरच केंद्रीत केले असा त्याचा अर्थ. तरीही उत्तर प्रदेशातील पाच शहरे अशी आहेत की जिथे योजना जाहीर झाल्यापासूनच्या पाच वर्षांमध्ये जेमतेम तीस टक्के कामे होऊ शकली आहेत. महाराष्ट्रातील स्थितीही हीच आहे. पुणे हे महाराष्ट्रातले बोलक्या लोकांचे मोक्याचे शहर आहे. इथे जे घडेल त्याचा प्रचार सर्व महाराष्ट्रात होईल हे भाजपला बरोबर कळले आहे. त्यामुळे सध्या त्या पक्षाने पुण्यावर लक्ष केंद्रीत केले आहे. चंद्रकांत पाटील यांनी कोल्हापूर सोडून पुण्यातून निवडणूक लढवण्याचे कारणही हेच होते. त्यामुळे स्मार्ट सिटी प्रकल्पातील ऐंशी टक्के कामे तिथे पूर्ण झाली असल्याचा दावा केला जात आहे. पण नाशिक, ठाणे, कल्याण अशा इतर शहरांची स्थिती फारशी चांगली नाही. एकूण महाराष्ट्रात जेवढ्या रकमेची कामे व्हायची होती त्यातील केवळ वीस टक्केच झाली आहेत. पुन्हा ही सर्व निव्वळ आकडेवारी झाली. प्रत्यक्षात काय कामे झाली आहेत आणि त्यामुळे ते शहर किती स्मार्ट झाले आहे याची कल्पना या आकडेवारीवरून येत नाही. त्यासाठी प्रत्येक शहराचा लेखाजोखा स्वतंत्रपणे मांडावा लागेल. पुण्याचे उदाहरण घेतले, जिथे ऐंशी टक्के कामे पूर्ण झाल्याचे सांगितले जात आहे, तर तिथल्या वाहतूक व्यवस्थेत काहीही सुधारणा झालेली दिसत नाही. एसी बसेस वाढल्या आहेत. पण मुंबईत एकेकाळी ज्याप्रमाणे कोठूनही कोठेही जाण्यासाठी बेस्ट बसेस उपलब्ध असत तशी उपलब्धता अजूनही झालेली नाही. पुणे हे विद्यार्थ्यांचे शहर आहे. शहराच्या विविध भागांमधून विद्यापीठात जाण्यासाठी थेट बसेस असायला हव्यात. पण अशा बसेस आपल्याला दिसत नाहीत. ९० टक्के लोकांना दोन बसेस कराव्या लागतील. मध्यंतरी शहराच्या विविध भागांमध्ये अतिशय कमी भाड्यामध्ये सायकल उपलब्ध करून देण्याचीही एक योजना आखण्यात आली होती. पण तीही पूर्ण बारगळली. शिवाय, सायकलवाल्यांना सुरक्षित वाटेल अशी पुण्याची वाहतूकही राहिलेली नाही. इतर शहरांमध्येही हीच स्थिती आहे. मुंबईत एकदा तिकिट काढल्यावर रेल्वे, बस अशा कोणत्याही वाहनातून प्रवास करण्याची सोय होणार होती. ती आजतागायत होऊ शकलेली नाही. मुळात आपली सर्वच शहरे अत्यंत बकालरीत्या वाढली आहेत. त्यांना शिस्त लावणे हे अतिशय अवघड काम आहे. त्यासाठी खूप लांबवरचा व ठोस विचार करायला हवा. अन्यथा, बागेमध्ये थोड्या नव्या पद्धतीच्या घसरगुंड्या बसवणे किंवा गरज नसताना मेट्रो रेल्वे सुरू करणे असले प्रकार घडतात. पुण्याचा स्वारगेटजवळचा उड्डाणपूल चुकीचा बांधला म्हणून पाडायची वेळ आली. स्मार्ट सिटीजमध्ये खरं तर लोकांचं आयुष्यात सुविहित होईल अशा कल्पक योजना राबवल्या जायला हव्यात. पण अनेकदा स्मार्ट म्हणजे भपकेबाज आणि चकचकीत योजना असा सरकारचा व प्रशासनाचा समज झालेला दिसतो. त्यामुळे ही सर्व शहरे दिवसेंदिवस राहायला त्रासदायक आणि खर्चिक होऊ लागली आहेत. यांच्या पिण्याच्या पाण्याचा, कचऱ्याच्या विल्हेवाटीचा, गलिच्छ वस्त्यांचा, हवेच्या प्रदूषणाचा असे कोणतेच प्रश्न नीटपणे सोडवले गेलेले नाहीत. तसे निदान एक शहर आपण निर्माण करू शकलो असतो तर बरे झाले असते.

मोदींच्या काळात विकलेले उद्योग!

जयंत माईणकर

> कोव्हिडमुळे अर्थव्यवस्था डबघाईस आली आहे. जागतिक पातळीवर रशिया युक्रेन युद्धामुळे काहीशी सावरत आलेली अर्थव्यवस्थाही पुन्हा उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे अशा परिस्थितीत एकीकडे रोजगार देण्याचे अभिवचन मोदी सरकार देत असताना दुसरीकडे या कंपन्या विकून देश चालवण्याचा आणि त्यापुढे जाऊन आपल्या बगलबच्च्यांना आर्थिकदृष्ट्या संपन्न करण्याचा घाट मोदी सरकारने घातला आहे.

‘मै देशको बेचाने नही दुंगा’, अशी घोषणा देत विश्व गुरु पंतप्रधान नरेंद्र मोदी आठ वर्षांपूर्वी सत्तेत आणले. प्रधान सेवक म्हणून प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न आजही त्यांचा सुरु आहे. सेवक मालक कधी झाला हे कोणाला कळले नाही. असे म्हणायचे कारण आजपर्यंत भारत सरकारचे अनेक उद्योग त्यांनी विकून टाकले आहेत अगदी स्वत:च्या मालकीचे असल्याप्रमाणे! यापुढे अजून दोन वर्षात सरकारी किती आणि कोणते उद्योग विक्रीस निघतील याचा अंदाज बांधणे अवघड आहे. नफ्यातला कोणताही उद्योगावर त्यांची नजर पडली कि त्याची विक्री झाली असे एकूण गणित आहे.

केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी संसदेत दिलेल्या माहिती प्रमाणे मार्च २० सालापर्यंत मोदी सरकारने २८ उद्योग विकले होते त्यातून सुरमारे ६५ हजार कोटी रुपये सरकारला मिळतील असा अंदाज होता. तसे मिळवण्याचा सरकारचा प्रयत्न होता. स्कुटर्स इंडिया लि. २५० कोटी ब्रिज अँड रुफ कंपनी लि.,भारत पंप्स अँड कॉम्प्रेसर लि, सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. ९०० कोटी, सेंट्रल इलेक्ट्रॉनिक्स लि., भारत अर्थ मूव्हर्स लि., फेरो सरप निगम, पवन हंस लिमिटेड, एअर इंडिया आणि तिच्या पाच सहयोगी कंपन्या तसेच एक संयुक्त उद्यम, एचएलएल लाइफ कीर, हिंदुस्थान अँटिबायोटिक्स ली, शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, बंगाल केमिकल्स अँड फार्मास्युटिकल्स लि, नीलांचाल इस्पात निगम लि, एचपीएल, इंजिनियरिंग प्रोजेक्ट्स इंडिया लि, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन, कंटेनर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, कंटेनर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, एनएमडीसी का नागरकर स्टील प्लांट, सेल का दुर्गापूर एलोय स्टील, सेलम स्टील प्लांट आणि भद्रावती युनिट, टीएचडीसी इंडिया लि, कारणात अँटिबायोटिक्स, इंडियन टुरिजम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन नॉर्थ इस्टरन इलेक्ट्रिक पॉवर को.लि, कामराज पोर्ट या कंपन्या तसेच एलआयसी विक्रीला काढली आहे . सरकार एलआयसीमधील १० टक्क्यांपर्यंतची हिस्सेदारी विकणार आहे. यातून त्यांना १०

लाख कोटी रुपये मिळण्याची अपेक्षा होती. त्यादृष्टीने प्रयत्न सुरु झाले आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पीय भाषणात एलआयसीमधील भागभांडवल विकण्याची घोषणा केली होती, पण कोरोना महामारीमुळे या प्रक्रियेला विलंब झाला. सरकारने एलआयसीमधील ५ टक्के हिस्सा विकल्यास हा देशातील सर्वात मोठा आयपीओ असेल. आणि १० टक्के भागभांडवल विकल्यास तो जगातील दुसऱ्या क्रमांकाचा विमा कंपनीचा आयपीओ ठरेल. हिंदुस्तान झिंक लिमिटेड (HZL) मधील उर्वरित हिस्सेदारी विकण्यासही सरकारला हिरवा कंदील मिळाला आहे. केंद्राने सर्वप्रथम १९९१-९२ मध्ये हिंदुस्थान झिंकमधील २४.०८ टक्के हिस्सा विकला होता. एप्रिल २००२ मध्ये, वाजपेयी सरकारने कंपनीतील २६ टक्के हिस्सा स्टेलाइटला ४४५ कोटी रुपयांना विकला. त्यानंतर कंपनीने हिंदुस्तान झिंकमधील आपला हिस्सा ६४.९२ टक्क्यांवर वाढवला. २०१२ मध्ये केंद्र सरकारने कंपनीतील २९.५४ टक्के हिस्सा विकण्याचा निर्णय घेतला होता. पण २००२ च्या करारातील आर्थिक अनियमिततेमुळे सर्वोच्च न्यायालयाने त्यावर बंदी घातली होती.

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये सरकारने हेलिकॉप्टर कंपनी पवन हंस विकण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू केली होती. यामध्ये सरकारचा ५१ टक्के तर ओएनजीसीचा ४९ टक्के वाटा आहे. याआधीही सरकारने अनेकवेळा ते विकण्याचा प्रयत्न केला, पण त्यात यश आले नाही. केंद्र सरकारने या आर्थिक वर्षात १.७५ लाख कोटी रुपयांच्या निर्गुंतवणुकीचे लक्ष्य ठेवले आहे. आतापर्यंत सरकारने पीएसयू मधील अल्पसंख्याक भागभांडवल आणि ॲक्सिस बँक मधील एसयूयूटीआय हिस्सेदारी विकून ९,३३० कोटी रुपये उभे केले आहेत.

संबंधित स्टोरीज सरकार बीपीसीएल मधील ५२.९८ टक्के हिस्सेदारी देखील विकत आहे. यासाठी तीन कंपन्यांनी सरकारला स्वारस्य दाखवले आहे. यामध्ये वेदांताने ५९ हजार कोटींची बोली लावली आहे.

याशिवाय अपोलो ग्लोबल मॅनेजमेंट आणि आय स्केअर कॅपिटलनेही यामध्ये रस दाखवला आहे. यासाठी जागतिक भागीदार मिळणे त्यांना कठीण जात आहे. सरकारने अलिकडेच टाटा समूहाला एअर इंडिया विकण्याचा निर्णय घेतला होता. आणि ती प्रक्रिया पूर्ण झाली. १८००० कोटी रुपयांना.

कोव्हिडमुळे अर्थव्यवस्था डबघाईस आली आहे. जागतिक पातळीवर रशिया युक्रेन युद्धामुळे काहीशी सावरत आलेली अर्थव्यवस्थाही पुन्हा उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे अशा परिस्थितीत एकीकडे रोजगार देण्याचे अभिवचन मोदी सरकार देत असताना दुसरीकडे या कंपन्या विकून देश चालवण्याचा आणि त्यापुढे जाऊन आपल्या बगलबच्च्यांना आर्थिकदृष्ट्या संपन्न करण्याचा घाट मोदी सरकारने घातला आहे. अडाणी यांची आशिया खंडात क्रमांक एकचे श्रीमंत उद्योगपती म्हणून झालेली उन्नती पाहता हातच्या कंकणाला आरसा लागू नये हे सत्य आहे. डिसइन्व्हेस्टमेंट पोर्टफोलिओ भारतीय जनता पक्षाच्या कालखंडात चर्चेला आला अरुण शौरी यांनी त्याबद्दल थेटपणे पाठराखण केली होती आणि त्या पुढचा अध्याय सध्याच्या सरकारने लिहिला आहे. स्वतः नरेंद्र मोदी व्यापारी तत्त्वावर देश चालवण्याच्या मनस्थितीत असल्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग मोठ्या प्रमाणात विक्रीस काढले जात आहेत. दूरसंचार खात्याचा लिलाव अशाच पद्धतीने एक दिवस होणार आहे. यात शंका नाही विशेषत: भारतातील नागरिकांना इंटरनेट आणि दूरसंचार सेवेची पूर्ण सवय झाल्यावर या सेवा खाजगी उद्योजकांना विकल्यावर या सेवा सध्या वापरत असणाऱ्यांची परिस्थिती काय होईल हे आपल्याला न सांगता ही समजेल मोदी सरकार उद्योग-व्यवसाय विक्रीस काढत आहे यातल्या बहुतेक सर्वच सार्वजनिक उद्योगांची पायाभरणी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या काळात झाली आहे त्यांच्या दुर्दर्शी विचारांना प्रत्यक्ष कृतीत आणण्याऐवजी सध्याचा दिवस गोड व्हावा यासाठी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कृतीशील विचारांचा लिलाव मांडला जात आहे एवढेच म्हणावे लागेल.

तूर्तास इतकेच!

यश-वास
राकेश लोहार

लोडशेडिंगचा शॉक

राज्यावरील वीकसंकट सध्या गंभीर आहे. कोळसा आणि पाणीटंचाईमुळे ऊर्जानिर्मितीवर परिणाम होत आहे. त्याच वाढत्या उष्णतेमुळे विजेची मागणी वाढली आहे. निर्मितीत घट आणि वाढती मागणी यामुळे लोडशेडिंगशिवाय पर्याय नसल्याचे सरकारचे म्हणणे आहे. त्यामुळे राज्यभर लोडशेडिंग करण्यात येत आहे. आधीच उकाड्याने हैराण झालेले नागरिक त्यामुळे त्रस्त झालेत. दरम्यान, कोल इंडियाकडून अपुरा कोळसा पुरवठा होत आहे. महानिर्मितीच्या कोयना जलविद्युत प्रकल्पातूनही पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती करावी लागत असल्याने पाण्याचा साठाही वेगाने कमी होत आहे. एप्रिलमध्ये ४५ अंश तापमान असून, कडक उन्हाने हैराण झालेल्या जनतेला भारनियमनाचा चटका सहन करावा लागत आहे. शेतकऱ्यांना या लोडशेडिंगमुळे शेतीला पाणी देण्यासाठी जीव धोक्यात घालून शेतात जावं लागत आहे. तसेच उद्योगधंद्यांनादेखील याचा फटका बसू लागला आहे. याविषयी जनतेमधून नाराजीचा सूर उमटू लागला आहे. भारनियमनचे वेळापत्रकच नसल्याने शेतकरी वर्ग व नागरिक फार वैतागले आहेत. गावातील पाणी पुरवठ्यावरदेखील या भारनियमनाचा परिणाम होत असून, लोडशेडिंगमुळे पाण्याची टाकी भरली जात नसल्याने रात्री-बेरात्री नळाला पाणी येत असल्याने महिला व नागरिकांची पुरेशी झोप होत नाही. परिणामी, गावात पाण्याची कृत्रिम टंचाई निर्माण होत असून, सार्वजनिक नळावर पाणी भरण्यासाठी मोठी गर्दी होत आहे, असे चित्र सगळीकडे पाहावयास मिळत आहे. पाणी भरण्यासाठी सार्वजनिक नळावर गर्दी केली जात असून, याठिकाणी पाणी भरण्यावरून वाददेखील होत आहेत. लोडशीडिंगमुळे पिकांचेदेखील नुकसान होऊ लागले आहे. दिवसा वीज नसल्यास शेतकऱ्यांना रात्र-रात्र जागून पिकांना पाणी द्यावे लागत आहे. पिकांना योग्य वेळी पाणी न मिळाल्यास ती करपून जाण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत पडले आहेत. खरे पाहता, भारनियमनाचा परिणाम सर्वसामान्यांपासून छोट्या-मोठ्या उद्योगधंद्यांवर होणार आहे. यातून अर्थचक्राला मोठी खीळ बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे महावितरण व शासनाविषयी असंतोष निर्माण झाला आहे. तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी या भारनियमनावर योग्य ती उपाययोजना करुन, भारनियमन तात्काळ कसे बंद करता येईल, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

सौरशेती फायदेशीर

सरकारी योजना साऱ्याच चांगल्या असतात; पण अंमलबजावणी कशी होते, यावरच त्या-त्या योजनेचे यशापयश अवलंबून असते. पुरेशी आणि वेळेवर वीज मिळत नसल्यामुळेच शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. उभे पीक पाण्याविना वाया जाते. ही परिस्थिती बदलण्याची सक्त गरज आहे; पण उपायच सापडत नसे. विजेची वाढती मागणी आणि अपुरा पुरवठा यामध्ये मेळ कसा घालायचा, असा पेच जुनाच आहे. हे खरे की, आपण ६१ टक्के वीज औष्णिक ऊर्जा केंद्रातून निर्माण करतो; पण त्यावर भागत नाही. म्हणूनच सन २०२४ पर्यंत १७५ गिगा वॉट अपारंपरिक ऊर्जा निर्मिती करण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने देशासमोर ठेवले आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रयत्न होत आहेत. पैकी सौर ऊर्जेचा पर्याय उपयुक्त ठरतो आहे. सौर ऊर्जा ही कधीही नष्ट न होणारी शक्ती आहे. विशेष असे की, आपल्या देशात आठ महिने आठ तास सौरऊर्जा मिळते. तज्ज्ञांचे सांगणे असे की, एका चौरस सेंटीमीटर क्षेत्रफळावर पडणाऱ्या सूर्यप्रकाशामुळे तीन फॅरेन्हाईट ऊर्जा तयार होते. ही ऊर्जा मेगा बॅटरिजमध्ये साठविता येते. त्याचा उपयोग अनेक कारणांसाठी करता येऊ शकतो. जगातील विकसित देशात असे हे उपयोग मोठ्या प्रमाणात करून घेतले जात आहेत. जर्मनीतल्या प्रत्येक घरावर सौर पी.व्ही. तंत्रज्ञानाचे पॅनल्स बसविले आहेत. घरे बांधण्याच्या खर्चामध्येच ते गृहीत धरलेले असते. सुमारे १.३ द.ल. घरामध्ये ३०,००० मे.वॅ. सौर ऊर्जा तयार होते. अतिरिक्त ऊर्जा ग्रिडला पुरविली जाते. अमेरिकेतही असे काही नाविन्यपूर्ण प्रयोग करण्यात आले आहेत. अमेरिकेतल्या फिनिक्स ते कॅलिफोर्निया या हमरस्त्याच्या दोन्ही बाजूनी सौर शेती केली जाते. पाचशे-हजार एकर क्षेत्रावर असे सौर पॅनल बसवून जी ऊर्जा तयार होते, ती आपल्या शेतीसाठी व दूध प्रकल्पांसाठी वापरून उर्वरित वीज ग्रीडला दिली जाते. दुष्काळी भागातील हे नैसर्गिक संसाधनाचे ऊर्जा भांडवल उद्योगांना ग्रीडमार्फत पुरविता येते. शेती पिकली नसली तरी त्या शेतीवर सौरशेती करता येते. याच पद्धतीने आपल्याकडेही प्रयोग प्रयत्न झाले पहिजेत. शासन-संशोधक-उद्योजक आणि शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सौरशेतीला उत्तेजन दिले पाहिजे. सहकार तत्त्वप्रणालीचा अंगिकार करूनही सौर शेतीचे प्रयोग करणे सहज शक्य आहे. सुदैव असे की, त्यासाठी सरकारही प्रोत्साहन देत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी ही संधी समजून तिचा फायदा घेणे, ही काळाची गरज आहे.

तात्पर्य : म्हणून मनुष्याने इतरांच्या नियत कर्मांचे अनुसरण करण्यापेक्षा पूर्णपणे कृष्णभावनेमध्ये आपले नियत कर्म करावे. भौतिकदृष्ट्या प्रकृतीच्या गुणांच्या प्रभावाखाली मनुष्याच्या मानसिक आणि शारीरिक स्थितीला अनुसरुन सांगण्यात आलेली कर्मे म्हणजे नियत कर्मे होत. आध्यात्मिक कर्मे म्हणजे, श्रीकृष्णांच्या दिव्य सेवेसाठी आध्यात्मिक गुरुने दिलेल्या आज्ञेनुसार केलेले कर्मे होत, परंतु भौतिक असो वा आध्यात्मिक असो, मनुष्याने दुसऱ्याच्या नियत कर्मांचे अनुकरण करण्यापेक्षा मृत्यूच्या अंतिम क्षणापर्यंत आपल्याच नियत कर्मामध्ये दृढ राहिले पाहिजे. आध्यात्मिक स्तरावरील कर्मे आणि भौतिक स्तरावरील कर्मे ही भिन्न असू शकतात; परंतु कर्म करणाऱ्यासाठी, अधिकृत मार्गदर्शनानुसार आचरण करण्याचे तत्व नेहमीच उत्तम असते. जेव्हा मनुष्य भौतिक गुणांच्या अधिपत्याखाली असतो तेव्हा त्याने आपल्या विशिष्ट परिस्थितीनुसार शास्त्रांच्या नियमांचे पालन केले पाहिजे तसेच त्याने इतरांचे अनुकरण करु नये. उदाहरणार्थ, सत्वगुणामध्ये असणारा ब्राह्मण अहिंसक असतो तर क्षत्रिय हा राजसिक गुणामध्ये असल्यामुळे त्याला हिंसक बनण्याची मुभा आहे. यास्तव अहिंसक तत्वाचे पालन करणाऱ्या ब्राह्मणाचे अनुकरण करण्यापेक्षा क्षत्रियाने, हिंसक नियमांचे पालन करतेवेळी पराभूत होणे हेच त्याच्यासाठी श्रेयस्कर आहे. प्रत्येकाने आकस्मिकपणे आपली हृदयशुद्धी न करता क्रमाक्रमाने करावी. तरीही जेव्हा एखादा भौतिक गुणांच्या पलिकडे जातो आणि पूर्णपणे कृष्णभावनेत स्थित होतो तेव्हा प्रमाणात अध्यात्मिक गुरुच्या मार्गदर्शनाखाली तो कोणतीही गोष्ट करु शकतो. कृष्णभावनेच्या अशा परिपूर्ण अवस्थेमध्ये क्षत्रिय हा ब्राह्मणाप्रमाणे कार्य करु शकतो किंवा ब्राह्मण हा क्षत्रियाप्रमाणे कार्य करु शकतो. दिव्य आध्यात्मिक स्तरावर भौतिक जगतातील विषमता लागू पडत नाही. उदाहरणार्थ, विश्वामित्र हे मूलतः क्षत्रिय होते, पण नंतर त्यांनी ब्राह्मण म्हणून कार्य केले तर परशुराम हे मूळतः ब्राह्मण होते, पण नंतर त्यांनी क्षत्रिय म्हणून कार्य केले. दिव्य स्तरावर स्थित असल्याने ते याप्रमाणे करु शकले; पण जोपर्यंत एखादा भौतिक स्तरावर आहे तोपर्यंत त्याने भौतिक प्रकृतीच्या गुणांनुसार कर्म केलेच पाहिजे. त्याचबरोबर त्याला कृष्णभावनेची पूर्ण जाणीव असणे आवश्यक आहे.

अर्जुन उवाच
अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पुरुषः ।
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ।।३६।।

अर्जुनः उवाच- अर्जुन म्हणाला; अथ- तर मग; केन- कशाद्वारे; प्रयुक्तः- प्रेरित केला जातो; अयम्- एखादा; पापम्- पापकृत्ये; चरति- करतो; पुरुषः- एक मनुष्य, अनिच्छन्- इच्छा नसताना; अपि- जरी; वार्ष्णेय- हे वृष्णिवंशजा; बलात्- बळेच; इव- जणू काय; नियोजितः- नियुक्त किंवा रत केलेला.

अर्जुन म्हणाला : हे वृष्णिवंशजा! कशामुळे मनुष्य त्याची इच्छा नसतानाही जणू काय बळेच, पापकर्मे करण्यास प्रेरित होतो?

तात्पर्य : जीव हा भगवंतांचा अंश असल्यामुळे मूलतः आध्यात्मिक, विशुद्ध आणि सर्व भौतिक कल्मषांपासून मुक्त असतो. म्हणून स्वभावतःच तो भौतिक जगाच्या पापामुळे प्रभावित होत नाही, परंतु जेव्हा तो भौतिक प्रकृतीशी संबंधित असतो तेव्हा तो निःसंकोचपणे अनेक पापमय मार्गांचे आचरण करतो. कधीकधी या प्रकारचे आचरण करण्याची त्याची इच्छाही नसते. यास्तव जीवाच्या विकृत स्वभावाबद्दल अर्जुनाने श्रीकृष्णांना विचारलेला प्रश्न समपर्क होता. जरी काही वेळा जीवाला पाप करावयाचे नसले तरी त्याला बळेच पाप करण्यास अंतर्यामी परमात्मा प्रेरित करीत नसून इतर कारणांमुळे पापकर्मे घडतात. त्यासंबंधी पुढील श्लोकात भगवंतांनी सांगितले आहे.

(क्रमशः)

लोकसंसद

माणुसकी हरवली !

हीच आमुची प्रार्थना,
अन् हेच आमुचे मागणे,
माणसाने माणसाशी,
माणसासम वागणे.

भूतलावर सर्व गोष्टी निर्माण करताना देवाने माणूसदेखील निर्मिला आणि या मानवाला सगळ्या प्राणीमात्रांपेक्षा कुशाग्र बुद्धिमत्ता असलेला मेंदूदेखील दिला. आपण २२ व्या शतकात प्रवेश केला आणि गेल्या दशकापासून ते आत्तापर्यंत आम्ही आमचा दैदीप्यमान विकास केलेला आहे. पण हा विकास होत असताना खरंच या माणसाला माणूसपण राहिलंय का? हा प्रश्न मनामध्ये मात्र थैमान घालू लागला आहे. अमानुष कृत्याचं दर्शन आपल्याला वृत्तपत्र व वेगवेगळ्या माध्यमातून जेव्हा डोळ्यांसमोर येतं तेव्हा मन अस्वस्थ होऊन जाते. बलात्कारासारखं निंदनीय कृत्य, स्त्रीयांवरील वाढत चाललेले अत्याचार, माणुसकीच्या नावाला काळीमा फासणाऱ्या या सर्व गोष्टी कधी थांबणार आहेत? म्हणूनच आजची स्त्री अबला की सबला हा प्रश्न देखील निरुत्तरीत आहे. प्रत्येक माणूस विचारी असतो. माणसाला मेंदू असतो अन् त्या मेंदूत अक्कल ही असतेच. पण त्या अकलेचं आज खोबरं झालेलं आहे. आपल्या भारतात अनेक युगपुरुष होऊन गेले, त्याचबरोबर नारीशक्तीनेही आपले अस्तित्व व सामर्थ्य जनमानसात उमटवलं. त्यातलेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, मदर तेरेसा, सावित्रीबाई फुले आदी महान व्यक्ती आहेत. या सर्वांनी स्वत: चंदनाप्रमाणे झिजून इतरांच्या आयुष्याला व इतरांना सुगंध दिलेला आहे. आजही अशा विचारसरणीची माणसं आहेत; पण ती मात्र हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढीच. बाबा आमटे, मंदाकिनी आमटे, महिन्याकाठी गलेलठ्ठ पगार घेऊन ऐश-आरामात घरी बसू शकले असते. पण त्यांनी तसे केले नाही. झिजणाऱ्या जीवांना नवजीवन देण्याचं काम त्यांनी आपल्या श्रमातून केलं. याचं कारण अशाच माणसांना माणुसकीतील माणूसपण कळलं होतं. आणि हे जेव्हा प्रत्येक मानवाला कळेल तेव्हा माणुसकी हरवलेला या समाजात खरा माणूस म्हणून ओळखला जाईल.

- दिव्या तानवडे, अलिबाग

भारतरत्न डॉ. काणे

१८ एप्रिल रोजी विख्यात कायदेपंडित आणि धर्मशास्त्राचे अभ्यासक महामहोपाध्याय, भारतरत्न डॉ. पांडुरंग वामन काणे यांची ५० वी पुण्यतिथी होती. या निमित्ताने राजभवन येथे एका विशेष टपाल तिकिटाचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी राज्यपालांनी पां. वा. काणे यांचे संशोधनकार्य पुढे नेण्याची गरज व्यक्त केली. डॉ. काणे यांचा जन्म कोकणातील वेदशास्त्र पारंगत अशा मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. वकिलीचा व्यवसाय करीत असताना त्यांचे संशोधनकार्य सातत्याने चालू होते. हिंदू धर्मशास्त्राचे विस्तृत आणि व्यापक विवेचन असलेला ‘धर्मशास्त्राचा इतिहास’ (१९३०-१९६२) हा पंचखंडात्मक आणि साडेसहा हजारांहून अधिक पृष्ठांचा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातून त्यांचे प्रकांड पांडित्य, अखंड व्यासंग आणि अविरत संशोधनाचा ध्यास दिसून येतो. धर्मशास्त्रावरील कोणत्याही वाद विवादामध्ये विद्वान मंडळी या ग्रंथातील मताला प्रमाण मानतात. यावरून या ग्रंथाचे महत्व लक्षात येते. विशेष म्हणजे भारत सरकारने या ग्रंथनिर्मितीसाठी १९६३ मध्ये त्यांना ‘भारतरत्न’ या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले. आंतरजातीय विवाह, विधवाविवाह, घटस्फोट इत्यादी सामाजिक गोष्टींचा पुरस्कार करणारे डॉ. काणे हिंदुधर्म सुधारणेच्या चळवळीतही कार्यरत होते. अस्पृश्यता, विधवेचे मुंडन करणे अशा अनिष्ट चालींना त्यांचा विरोध होता. त्यामुळे मुंडन न केलेल्या विधवेला पंढरपुरात विठ्ठल पूजेचा अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी वकीलपत्र घेतले होते. सद्याच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय वातावरणाच्या पार्श्वभूमीवर डॉ. पांडुरंग वामन काणे यांनी धर्मशास्त्र आणि भारतीय संस्कृती याविषयी केलेले प्रचंड संशोधनकार्य नवीन पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज निर्माण झाली आहे.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

आधुनिक यंत्रणा आणणे गरजेचे

महाराष्ट्रात भारनियमनाचा प्रश्न तीव्र स्वरुप धारण करत असताना नुकताच जेएनपीटी ते पळस्पे या मार्गावर भरदिवसा सकाळी नऊ वाजेपर्यंत पथदिवे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे हे असले बेजबाबदारपणाचे प्रकार शासन,स्थानिक पातळीवर वारंवार पाहायला मिळतात असाच प्रकार अनेक घरातूनही राजरोसपणे दिसून येतो हे जर थांबवायचे असेल तर आपल्या पासूनच सुरुवात करायला हवी तसेच विजेची बचत करणे सध्या काळाची गरज बनली आहे. मागणीपेक्षा विजेचा पुरवठा कमी असल्यामुळे नागरिकांना भारनियमनाचा सामना करावा लागत आहे. मात्र प्रत्येकाने घरामध्ये विजेचा वापर करताना काळजी घेतली तर भरपूर विजेची बचत होऊ शकते. घरातील व्यक्तींनी या सूचनांचे पालन केल्यास वीज बचत होईलच, शिवाय बिलदेखील कमी येईल. खोल्यांमध्ये लाईट लावले जातात. परंतु, यामुळे विजेची नाहक उधळपट्टी होते. त्याऐवजी आवश्यक असेल तेव्हा केवळ संबंधित खोलीमध्ये लाईट सुरू करावी. फ्रीज सतत उघडल्यास त्यामधील थंड तापमान कमी होते व पुन्हा निर्माण करण्यासाठी वीज जास्त जळते. अवास्तव विजेचा वापर करण्यापेक्षा आवश्यक आणि गरजेनुसार केला तर निश्चिच वीज बचत होईल हे मात्र नक्की !!

- राजू जाधव, मांगूर

थोडक्यात

वावोशीत भीमजल्लोष

। वावोशी । वार्ताहर ।

खालापूर तालुक्यातील वावोशी भीमनगरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती विविध सांस्कृतिक कार्यक्रम, मिरवणूक आणि भीम मूर्तीची प्रतिष्ठापना करून साजरी करण्यात आली. यानिमित्त लहान मुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच या मुलांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष राजाराम मोरे आणि कार्यकर्त्यांकडून सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी वावोशी गावच्या उपसरपंच सुनीता भालेराव यांच्या हस्ते पंचशील ध्वज फडकविण्यात आला तर माजी सरपंच राजू शहासने यांच्याकडून भीमनगर मधील बुद्धविहाराला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती भेट देण्यात आली.

आंबेडकर जयंती उत्साहात

। माणगाव । वार्ताहर ।

महाड येथील हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाड महाविद्यालयात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती गुरुवार दि.१४ एप्रिल रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. ग्रंथालय विभागातर्फे यावेळी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे प्रा. सुदेश कदम, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया आणि संचालिका सौ, सोनाली धारिया यांच्या प्रोत्साहनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडरांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी व त्यांना मानवंदना देण्यासाठी या निबंध स्पर्धा व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

रायगडचा देवदूत कल्पेश ठाकूर

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

पेणचा कल्पेश ठाकूर हा अपघातात सापडलेल्यांसाठी देवदूत ठरला आहे. गेल्या सोळा वर्षांत त्याने सुमारे ४८५ अपघातग्रस्तांचे जीव वाचवले आहेत. साईभक्त असणाऱ्या या देवदूताने स्वखर्चाने रुग्णवाहिका सेवा चालू ठेवली आहे. परिसरात अपघात झाल्याचे कळताच ते स्वतः वाहन चालवीत मदतीला धावून जातात. त्यांचे पेणच्या पुढे आंबिवली येथे साई सहारा नावाचे हॉटेल आहे. कल्पेश हे वयाच्या विशीतच खरेखुरे जनसेवक ठरले. त्यांचे जिवलग मित्र शिवैक्य सचिन पाटील यांचा २००४ साली उंबर्डे फाट्यावर अपघाती मृत्यू झाला. त्यावेळी वाहन, रुग्णवाहिका न मिळाल्याने मित्र गेल्याच्या दुःखातूनच कल्पेश हे देवदूत बनले.

आचार्य कुटुंबाकडून मंगळसूत्र दान

। पाली/बेणसे। वार्ताहर ।

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आंबेडकरवादी मिशन केंद्र नांदेड येथे सलग अठरा तास अभ्यास उपक्रमाद्वारे हजारो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये पंचशील ध्वजारोहणानंतरच्या मनोगतामध्ये रायगड जिल्ह्यातील आचार्य परिवाराने त्यांच्या लग्नाच्या वेळेस केलेले मंगळसूत्र कुटुंबातील चारही सदस्यांच्या संमतीने आंबेडकरवादी मिशन केंद्र प्रमुख आयु. दीपक कदम यांना दान केले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे मिशन जोमाने चालले पाहिजे, बहुजन समाजातील मुले शिकली पाहिजेत, यासाठी आंबेडकर मिशन कार्यरत आहे. या मिशनला विविध स्तरातून मदत मिळत आहे. आचार्य कुटुंबियांनी देखील या मिशनला हातभार लावला आहे.आपल्या भावना व्यक्त करताना प्रा. डॉ. पी.बी. आचार्य म्हणाले की, मंगळसूत्राच्या स्वरुपात असलेल्या सोन्याचे आंबेडकरवादी मिशन केंद्राला दिलेल्या दानातून खरे सोने होईल, असे आचार्य सर म्हणाले.

शाळापूर्व तयारी मेळावा

। माणगाव । वार्ताहर ।

रायगड जिल्हा परिषद शाळा वावे/निजामपूर शाळेत शाळापूर्व तयारी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३१ वी जयंती दि. १४ एप्रिल मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रकांत जाईलकर होते. या कार्यक्रमास केंद्रप्रमुख अजय पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पंकज शिर्के, उपाध्यक्ष प्रकाश सालदुर, मुख्याध्यापिका सायली वाटवे, सुप्रिया शिर्के, गोरख भोरावकर, अंगणवाडी ताई निर्मला भोरावकर, श्रीमती मारणेबाई, पालक वर्ग, महिला वर्ग, माजी विद्यार्थी समीर शिर्के, संकेत मारणे इत्यादी उपस्थित होते.

वातानुकूलित खोल्यांना पसंती

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

मागील आठ दिवसांपासून श्रीवर्धन तालुक्यामध्ये पारा मोठ्या प्रमाणावर चढलेला पाहायला मिळत आहे. मागील आठवड्यात १४ एप्रिलपासून सलग सुट्ट्या आल्या होत्या. त्यामुळे श्रीवर्धन तालुक्यात पर्यटकांनी मोठ्या प्रमाणावर बुकिंग केली होती. परंतु, ज्या पर्यटकांनी वातानुकूलित यंत्रणा असलेल्या खोल्यांची बुकिंग केली नव्हती, अशा पर्यटकांना खूप मोठ्या प्रमाणावर उष्म्याचा त्रास सहन करावा लागला. तर आयत्या वेळी येणारे पर्यटकसुद्धा वातानुकूलित खोलीचीच मागणी रिसॉर्ट किंवा हॉटेल मालकांजवळ करत असल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे आपल्या हॉटेलमधील खोल्यांमध्ये वातानुकूलित यंत्रणा बसविण्यासाठी हॉटेल मालक तातडीने लगबग करत असल्याचे पाहायला मिळत आहे.

महापुरुषांना सांगीतिक मानवंदना

। अलिबाग । वार्ताहर ।

महापारेषण कंपनीतर्फे बुधवार, दि.१३ एप्रिल रोजी महापुरुषांना अभिवादन करण्यासाठी आणि त्यांच्या कार्याला वंदन करण्यासाठी संयुक्त सांगीतिक जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात राजेश शिर्के आणि मंडळी यांनी क्रांतिकारी ऑर्केस्ट्रा प्रस्तुत 'बोधीसत्त्व गाथा' एक प्रबोधनाचा संगीतमय कार्यक्रम सादर केला. 'मी आंबेडकर' या नावाने विचारलेख महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी सर्वांसमक्ष सादर केला. या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक दिनेश वाघमारे प्रधान सचिव, ऊर्जा तथा अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण हे होते.

खुलेआम गुटखा विक्री

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यात अवैध गुटखा विक्रीला ऊत आला आहे. एवढंच नाही तर काही गुटखा विक्रेते होलसेल बनले असून, तालुक्यातील खेड्या-पाड्यात गुटखा पुरवण्याचे काम सुरू केले आहे. महाराष्ट्र सरकारने गुटखा विक्रीवर बंदी आणली, मात्र ही बंदी कागदावरच असल्याचे दिसून आले आणि असाच गुटखा व्यवसाय तालुक्यात जोरात सुरू आहे. पोलीस आणि अन्न प्रशासन विभागाच्या आशीर्वादाने या परिसरात सर्रासपणे गुटखा विक्री सुरु असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे. रायगड जिल्ह्यातील अनेक भागात गुटखा विक्रेत्यांवर कारवाई होत असताना, उरणमध्ये मात्र कारवाई होताना दिसत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

सर्पमित्राने दिले सापाला जीवदान

। सुधागड-पाली । वार्ताहर ।

जांभुळपाडा गावाजवळील टाटाचा माळ येथील गणेश माळी यांच्या हॉटेलमध्ये सशाच्या मोठ्या पिंजऱ्यात सोमवारी (ता.१८) धामण जातीचा साप शिरला होता. या सापाला येथील सर्पमित्र दत्तात्रेय सावंत यांनी शिताफीने पकडून जीवदान दिले. हा साप पिंजऱ्यात सशाने खोदलेल्या बिळात लपलेला होता. सावंत यांनी हे बिळ खोदून शेपटी पकडून सापाला व्यवस्थित बाहेर काढले. त्यानंतर वनविभागाचे कर्मचारी योगेश साजेकर यांनी या सापाला जंगलात सुखरूप सोडले. मानवी वस्तीत साप आल्यास कोणीही घाबरून जाऊ नये. तसेच सापाला कोणतीही दुखापत न करता जवळच्या सर्पमित्राला बोलवावे, असे आवाहन सर्पमित्र दत्तात्रेय सावंत यांनी केले.

आदिवासींचा पाणीप्रश्न कायमचा मिटला

। पाली/बेणसे। वार्ताहर।

सुधागड हा आदिवासीबहुल तालुका असून, येथील दुर्गम दुर्लक्षित व डोंगर कड्या कपारीत वसलेल्या शेकडो आदिवासी वाड्या पाड्या गावांना मुबलक पाणीपुरवठा व्हावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

प्रशासनाला याकामी स्वदेश फाऊंडेशनची मोलाची साथ लाभली आहे. बौद्ध विकास मंडळ पाच्छापूर पंचशीलनगरात सोलर नळपाणी पुरवठा योजनेचे नुकतेच

सोलर नळपाणी पुरवठा योजनेचे उद्घाटन | महिलांच्या चेहऱ्यावर उमटले हसू

उद्घाटन करण्यात आले. यामुळे येथील आदिवासींचा पाणीप्रश्न कायमचा मिटला आहे.

यावेळी शेकाप नेते तथा जि.प.चे माजी सदस्य सुरेश खैरे यांनी, पाणी हे जीवन आहे, मानवी वस्तीत मुबलक व शुद्ध पाणीपुरवठा व्हावा यासाठी आम्ही कायम प्रयत्नशील आहोत. विकासकामांमध्ये नळपाणी पुरवठा योजना राबविण्यावर विशेष भर दिला जातोय. पंचशीलनगरमधील या योजनेला लवकरच आरसीसीमध्ये पाण्याची टँक बनवून देऊ, असे आश्वासन

(छायाचित्र : धम्मशील सावंत)

दिले. यावेळी तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी पंचशीलनगराचा सर्वांगीण व शाश्वत विकास होत असल्याचे समाधान व्यक्त केले. तसेच स्वदेश फाऊंडेशनचे शिवदास पायल यांनी सदर योजनेची माहिती दिली. यावेळी शेकाप नेते सुरेश खैरे, तहसीलदार दिलीप रायन्नावार, सुधागड तालुका बौद्धजन पंच कमिटी अध्यक्ष भगवान शिंदे, प्रभाकर गायकवाड, स्वदेश फाऊंडेशन व्यवस्थापक शिवदास पायल, अमूल त्रिभुवन, सिद्धांत गायकवाड, राहुल महाडिक, मधुकर महाडिक, विजय महाडिक, ग्रामविकास समिती पंचशीलनगर, बौद्ध विकास मंडळ पंचशीलनगर ग्रामस्थ उपस्थित होते.

वळके येथे ५२ जणांनी केले रक्तदान

। रेवदंडा । वार्ताहर ।

मुरूड तालुक्यातील वळके येथे हनुमान जयंतीच्या निमित्त रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचा प्रारंभ माजी आ. पंडित पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. या शिबिरात एकूण ५२ जणांनी रक्तदान केले.

वळके येथील स्वस्तिक प्रतिष्ठानच्या वतीने जिल्हा शासकीय रक्तपेढीच्या सहकार्याने हे रक्तदान शिबीर हनुमान मंदिराच्या प्रांगणात आयोजित करण्यात आले

होते. या शिबिरास माजी आ. पंडित पाटील यांच्यासह मुरूड पंचायत समितीचे उपसभापती चंद्रकांत मोहिते, वळके सरपंच किशोर काजारे, मनसे तालुका सरचिटणीस राजेश तरे, तसेच ग्रामस्थ व महिला मंडळ वळके यांची उपस्थिती होती.

या शिबिरात महिलांचा विशेष सहभाग होता, तर स्वस्तिक प्रतिष्ठानचे सर्व सदस्य, वळके

॥ पंडित पाटील यांची शिबिरास भेट

ग्रामस्थ, युवावर्ग यांनी रक्तदान केले.

रक्तदान शिबीर यशस्वीपणे संपन्न होण्यासाठी स्वस्तिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष जगदीश भगत, सचिव राकेश भगत यांच्यासह सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश चवरकर यांनी, तर उपस्थितांचे आभार रमेश भगत यांनी मानले.

गोमाशी येथे आरोग्य शिबीर

। पाली/गोमाशी। वार्ताहर।

कोमल महिला बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित तसेच स्वदेस फाऊंडेशन यांच्या सहकार्यातून गोमाशी येथे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना शिबिराचे आयोजन सोमवार, दि. १८ एप्रिल रोजी करण्यात आले होते. या शिबिरात गोमाशी येथील ६० कुटुंबियांनी आपली नावनोंदणी करून प्रत्यक्षरित्या या योजनेचा लाभ मिळविला. या योजनेतून भविष्यात या कुटुंबांना सुख समृद्धीचे आरोग्यमय जीवन जगण्यासाठी खूप महत्त्वाचे सहकार्य मिळणार असून प्रत्येक गाव आदर्श गाव संकल्पना आपल्या विचारांत निर्माण करीत आहे. या शिबिरासाठी मुंबई सायन हॉस्पिटल येथून नूतन चौगुले तसेच कर्जत येथून विद्या पवार गाव विकास समिती आणि ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ, स्वदेश समन्वयक जितेंद्र म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

। महाड । प्रतिनिधी।

आजादी का अमृत महोत्सव या कार्यक्रमांतर्गत संपूर्ण देशात राबवण्यात येणाऱ्या आरोग्य शिबिरापैकी महाडमध्ये आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले आमदार गोगावले यांनी माणसाला कोणताच आजार होऊ नये यासाठी प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे, असे प्रतिपादन केले.

महाड ग्रामीण रुग्णालयात या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन आ. भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड,

गटविकास अधिकारी भाऊसाहेब पोळ, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. भास्कर जगताप, महाड नगर पालिकेचे मुख्याधिकारी महादेव रोडगे, अन्न औषध समितीचे सदस्य मोहन शेठ, ग्रामीण रुग्णालय आरोग्य समिती सदस्य सिद्धेश पाटेकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरामध्ये कान, नाक, घसा, महिलांचे आजार, कॅन्सर, नेत्ररोग, हाडांचे आजार आदी आजारांवर तपासणी आणि उपचार केले जात आहेत. शिबिरात जवळपास ४५० रुग्णांनी नोंदणी केली होती. या सर्वांवर या ठिकाणी तपासणी करून उपचार केले जाणार असल्याची माहिती शिबिराचे अध्यक्ष भाऊसाहेब पोळ यांनी दिले.

मोफत आरोग्य तपासणी शिबीर

। खांब-रोहा। वार्ताहर ।

पनवेल हॉस्पिटल मल्टीस्पेशालिटी महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत व कन्झुमर राईट्स ऑर्गनाईजेशन महाराष्ट्र आणि ग्रा.पं. निडी, ता. रोहा यांच्या वतीने रा.जि.प. प्राथमिक शाळा निडी येथे दि.२१ एप्रिल रोजी स.१० ते दु.२ या वेळेत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात रक्तदाब तपासणी, ५० वर्षांवरील रुग्णांसाठी मोफत मधुमेह तपासणी, गरजू रूग्णांसाठी ईसीजी तपासणी, स्त्रियांचे आरोग्य तपासणी, मुतखडा तपासणी, मुत्रपिंड, मुत्रमार्ग विकार, हाडांच्या शस्त्रक्रिया, न्युमोनिया, दमा व फुफ्फुसांचे आजार आदी आजारांबरोबर मोफत नेत्रतपासणी व चष्मे वाटप आदींवर उपचार केले जाणार आहेत.

दरम्यान, डॉ. सुरेश करांडे डॉ. आरती करांडे, डॉ. फरीद चिमावकर आदी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात येऊन मार्गदर्शन मिळणार आहे. तरी गरजू रुग्णांनी शिबिरात येताना पिवळे रेशनकार्ड, केशरी रेशनकार्ड, आधारकार्ड किंवा मतदान कार्ड व जुने रिपोर्ट तसेच मोबाईल क्रमांक आणणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी जनसंपर्क अधिकारी संजय भंडारी ९७०२२५८८२८ व रामदास घुले ९९२१३०८७२६ यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आरोग्य तपासणी

पनवेल : अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरी प्रणित शाखा पनवेलतर्फे हनुमान मंदिर, पोदी नं. ३, सेक्टर-१६, नवीन पनवेल येथे अखंड नाम जप यज्ञ सप्ताह सोहळ्याचे नियोजन २२ ते २८ एप्रिल या काळात केले आहे. या काळात २४ एप्रिल रोजी रक्तदान शिबीर तसेच २६ एप्रिल रोजी सद्गुरू मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल ट्रस्ट, त्र्यंबकेश्वर अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी तसेच नाडी परीक्षण आणि सर्व रोग निदान शिबीर सकाळी १० ते रात्री ८ या काळात आयोजित केले आहे. अधिक माहितीसाठी ९९८७५७३४२ येथे संपर्क साधावा.

समर कॅम्पचे आयोजन

पनवेल : कलाविष्कार अकॅडमीतर्फे मुलांसाठी समर कॅम्प आयोजित केला आहे. ज्यामध्ये डान्स, क्विंग, ड्रॉईंग व म्युझिक या विषयांचे अनुभवी तज्ज्ञांद्वारा प्रशिक्षण दिले जाईल, हा कॅम्प २२ ते २९ मे सिनिअर सिटिझन हॉल नवीन पनवेल येथे होणार आहे. सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी ७०२१०३४७२८ / ९८१९६७५५४२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

म्हसळा तालुक्याची पहिली पाहुणचार बैठक संपन्न

। म्हसळा । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्यमंत्री तथा पालकमंत्री अदिती तटकरे यांचे शिफारशीने गठीत केलेल्या म्हसळा तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची पहिली पाहुणचार सभा म्हसळा तहसीलदार कार्यालयात समिती अध्यक्ष महेश शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

तहसीलदार समीर घारे, नायब तहसीलदार के.टी. भिंगारे यांच्या उपस्थितीत आघाडी पक्षाचे नवनियुक्त समिती सदस्य महादेव पाटील, ग्रामविस्तार अधिकारी एस.डी. शिंदे उपस्थित होते.

समिती पाहुणचार सभेत समिती अध्यक्ष महेश शिर्के आणि सर्व सदस्यांचे तहसीलदार तथा समिती सचिव समीर घारे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. अध्यक्ष महेश शिर्के यांनी समितीचे कामकाजाबाबत चर्चा करताना सदस्यांनी आपल्या विभागातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचून संजय गांधी निराधार योजनेचा वंचित लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत जेणेकरून कुठल्याही दुर्गम भागातील लाभार्थी शासकीय अनुदान योजनेपासून वंचित राहू नयेत, असे सूचित केले.

मोहन माळी यांना हायकोर्टाकडून न्याय

। उरण । प्रतिनिधी ।

उरण येथील ज्येष्ठ नागरिक मोहन माळी यांना आपल्या खोलीचा ताबा देण्याचे आदेश उच्च न्यायालयाने भाडेकरुला दिले आहेत. यासाठी आवश्यक असल्यास पोलीस संरक्षण देण्यात यावे, असेही न्यायालयाने निकालात म्हटले आहे, असे माळी यांचे म्हणणे आहे.

मोहन माळी यांनी आपल्या घरात विक्रम शिंदे यांना भाडेकरार करुन राहण्यास खोली दिली होती. परंतु, सहा महिन्यांहून अधिक काळ शिंदे यांनी भाडे न देता खोलीवर ताबा दाखविला होता. सातत्याने भाड्याची मागणी करुनही ते देत नसल्याने घरमालकाने खोली खाली करण्यास सांगितले. परंतु, शिंदे यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. शेवटी घरमालक माळी यांनी उरण कोर्टात दावा दाखल केला होता. याचा निकाल आपल्या बाजूने लागला होता. त्यानंतर शिंदे यांनी जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले होते, अशी माहिती मोहन माळी यांनी दिली.

परंतु, जिल्हा न्यायालयानेसुद्धा उरण न्यायालयाचा निकाल कायम ठेवत शिंदे यांना खोली खाली करण्याचे आदेश दिले होते. याविरोधात शिंदे यांनी उच्च न्यायालयातसुद्धा अपील दाखल केले. परंतु, उच्च न्यायालयानेसुद्धा जिल्हा न्यायालयाचा निकाल कायम ठेवत विक्रम शिंदे यांना खोलीचा ताबा सोडण्याचे आदेश दिले. शिवाय, याकामी पोलिसांची मदत लागल्यास ती पुरवावी, असेही न्यायालयाने निकालात म्हटले आहे. मोहन माळी यांच्या वतीने ॲड. सचिन शेट्ये, सारिका शेट्ये आणि प्रभा उदय बडघरे यांनी बाजू मांडत न्याय मिळवून दिला, असे मोहन माळी यांनी सांगितले आहे.

श्रीवर्धन हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

। श्रीवर्धन । वार्ताहर।

श्रीवर्धन हायस्कूलच्या १९८२ च्या एसएससी बॅचच्या विद्यार्थ्यांनी तब्बल चाळीस वर्षांनी श्रीवर्धन नजीकच्या जसवली तळे येथे असलेल्या पतंगे रिसॉर्ट ॲन्ड रेस्टॉरंट या ठिकाणी दि.१७ एप्रिल रोजी एकत्र जमून आपल्या भूतकाळातील साऱ्या स्मृतींना उजाळा दिला. ठिकठिकाणी असलेले सुमारे २५ विद्यार्थी-विद्यार्थिनी या कार्यक्रमासाठी एकत्र आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस जे जुने

वर्गमित्र-मैत्रिणी स्वर्गवासी झाले आहेत. त्यांना प्रथम श्रद्धांजली वाहण्यात आली. तद्नंतर या विद्यार्थ्यांच्या तत्कालिन शिक्षक-शिक्षिकांचे स्वागत करण्यात आले. तेव्हा सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपापला परिचय करुन दिला. यानंतर तत्कालिन शिक्षक सर्वश्री आनंद तथा नंदा जोशी, शर्मिला जोशी, शशिकांत बंदरकर यांचा शाल-श्रीफळ-पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

उपस्थित सर्व शिक्षक, शिक्षिकांनी आपले मनोगत व्यक्त करुन या विद्यार्थ्यांच्या स्मृतींना उजाळा दिला व त्यांनी दाखविलेल्या कृतज्ञतेबद्दल समाधान व्यक्त केले. सर्वांनी एकत्र सहभोजन केल्यानंतर दुपारच्या सत्रात सर्व उपस्थित विद्यार्थ्यांनी अंताक्षरी, प्रश्नमंजुषा आदी उपक्रमांचा आनंद लुटला. सायं. ५.३० च्या सुमारास या गोड कार्यक्रमांची सांगता झाली.

कर्णबधीर मुलांच्या रॅम्पवॉकने मिळविली वाहव्वा

स्मार्ट मम्मीज ग्रुपकडून अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल स्मार्ट मम्मिज या सेवाभावी संस्थेच्या वतीने लहान मुलांसाठी रॅम्प वॉक अर्थात फॅशन शोचे आयोजन केले होते. पनवेलच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात रविवार, दि.१७ एप्रिल रोजी हा शानदार फॅशन शो संपन्न झाला. विशेष म्हणजे, कर्णबधीर मुलांनीदेखील या फॅशन शोमध्ये रॅम्प वॉक करत उपस्थितांची वाहवा मिळवली. माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे आणि रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा इंटकचे राष्ट्रीय सचिव महेंद्र घरत यांची या फॅशन शोला विशेष उपस्थिती होती.

पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, भाजयुमो

पनवेलकरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष विक्रांत पाटील, ममता प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करून कार्यक्रमाला प्रारंभ करण्यात आला. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या मुलांसाठी आठ वर्षाखालील व आठ वर्षावरील ते १३ वर्षांपर्यंत असे दोन गट बनविण्यात आले होते. ग्रुप ए मध्ये पनय वीरा हा प्रिन्स ठरला, तर आरोही मजिठीया प्रिन्सेस ठरली. तर ग्रुप बी मध्ये रेनित ठक्कर याला प्रिन्सचे टायटल मिळाले, तर वेदिका पवार हिने प्रिन्सेस चे टायटल जिंकले.

ग्रुप ए मध्ये मुलांच्यात स्वयम् थोरात दुसऱ्या स्थानी आला, तर वेद गांधी याने तिसरा क्रमांक पटकावला. मुलींच्यात अवंतिका धात्रक ही फर्स्ट रनर अप ठरली, तर सानवी कदम ही सेकंड रनर अप ठरली. मोठ्यांच्या बी ग्रुप मध्ये मुलांच्यात अथर्व भोईर फर्स्ट रनर अप ठरला, तर आराध्य म्हात्रे सेकंड रनर अप ठरला. मुलींच्यात काव्या सोनेटा फर्स्ट रनर अप, तर शनाया गांधी सेकंड रनर अप ठरली. याव्यतिरिक्त जियाना मुलजी हिने बेस्ट स्माईल, कियारा जैन हिने बेस्ट अटायर, अमैरा शहा हिने मिस ब्युटिफुल, सानवी कदम हिने बेस्ट वॉक, आरोही पाठारी हिने मोस्ट स्पार्कलिंग आईज ही टायटल पटकावली. मुलांच्यात समर्थ चौहान यास बेस्ट वॉक, पनय विरा बेस्ट अटायर, स्वयम् थोरात बेस्ट फोटोजेनिक फेस, वेद गांधी मोस्ट कॉन्फिडंट, अशी टायटल मिळाली. मोठ्या ग्रुपमध्ये सान्वी तडके हिला मोस्ट फोटोजेनिक फेस, जानकी वारिया हिला रायझिंग स्टार, पूर्वा लामतुरे हिला मिस स्टायलिश, रीतन्या म्हात्रे हीला ब्यूटीफुल हेयर, तर स्वरा शिंदे हिला मोस्ट कॉन्फिडन्ट ही टायटल्स देण्यात आली. तर मुलांच्या ग्रुपमध्ये रेनीत ठक्कर याला स्टाईल आयकॉन आणि आराध्य म्हात्रे याला हँडसम हंक हे टायटल देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, रोटरी क्लब संचालित कर्णबधीर मुलांच्या शाळेतील मुलांनी अत्यंत आत्मविश्वासाने रॅम्पवॉक सादर केला. उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात या मुलींचे रॅम्पवर स्वागत केले. या फॅशन शो साठी डॉक्टर स्वाती हांडे, सोनी ठक्कर, आणि नंदिनी भाटकर यांनी जजेस म्हणून अत्यंत चोख पद्धतीने काम पाहिले.तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शीतल ठक्कर यांच्या बरोबरीने नैना बाठीया, नीता कोटक, कविता ठाकूर, मेघना भानुषाली, नेहा गांधी यांनी अथक परिश्रम घेतले. तर आपल्या बहारदार आवाजात आणि शेरो शायरीच्या अनोख्या बरसातींनी कोमल वीरा यांच्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमात अनोखा बहर आणला. वैभव जोशी यांच्या माध्यमातून हजारो प्रेक्षकांनी घरबसल्या या फॅशन शो चा यु ट्युब लाईव्ह वर आनंद लुटला.

म ह त्त्वा चे

उतेखोलवाडीत शाळापूर्व मेळावा

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव नगरपंचायत हद्दीतील विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवून रायगड जिल्ह्यात नावलौकिक मिळविलेल्या रा.जि.प. शाळा उतेखोलवाडी येथे सन २०२२-२३ मध्ये शाळेत इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळा पूर्वतयारी अभियान कार्यक्रमांतर्गत शाळापूर्व तयारी मेळावा मंगळवार, दि.१९ एप्रिल रोजी सकाळी विविध मान्यवर, पालकवर्ग, शिक्षक विद्यार्थी यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

कोमसापचा वर्धापनदिन

। माणगाव । वार्ताहर ।

कोकण मराठी साहित्य परिषद तळा शाखेचा सातवा वर्धापनदिन एस.एस. निकम इंग्लिश स्कूल इंदापूर येथे सोमवार, दि. १८ एप्रिल रोजी प्रसिद्ध कवींच्या काव्यवाचनाने उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माणगावचे नायब तहसीलदार संजय माने, को.म.सा.प.माणगाव शाखा अध्यक्ष तथा जिल्हा कार्यवाह अजित शेडगे, जिल्हा समन्वयक अ.वि. जंगम, तळा पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, को.म.सा.प. तळा संस्थापक पुरुषोत्तम मुळे, तळा शाखा अध्यक्ष हेमंत बारटक्के आदी व्यासपीठावर उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन व सरस्वतीपूजन करण्यात आले.

कब्रस्तान दफन विधीकरिता खुले

विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या मागणीला यश

। पनवेल । प्रतिनिधी ।

सिडको प्राधिकरणामार्फत करण्यात आलेली सुसज्ज दफनभूमी मुस्लिम बांधवांना दफन विधीसाठी खुली करावी, अशी मागणी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी केली होती. त्यांच्या मागणीला यश आले असून, ती दफनविधी करिता खुली करण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. यासंदर्भात पनवेल महापालिकेची सर्वसाधारण सभा १९ एप्रिल रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडली. या सभेत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर उपस्थित होत्या. यावेळी अग्निशमन दलासाठी १५ कोटी रुपयांची वाहन खरेदी करण्यासाठी मंजुरी मिळाली आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तळोजा फेस १, सेक्टर १५ येथील भूखंड क्रमांक आठ/नऊ येथे सिडको प्राधिकरणामार्फत सुसज्ज दफनभूमी तयार करण्यात आली आहे. पालिकेने सिडकोसोबत हस्तांतरणाची कार्यवाही केली नसल्याने कब्रस्तान दफन विधीकरिता खुले करण्यात आले नाही. त्यामुळे परिसरातील मुस्लिम समाज बांधवांना दफन विधी करता पनवेल, खारघर, मुंबई येथे जावे लागते. त्यामुळे कुटुंबियांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. तळोजा येथील मुस्लिम बांधवांसाठी कब्रस्तान हस्तांतरित करून दफन विधी खुली करण्यासाठीची मागणी महाविकास आघाडी आणि विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर, नगरसेवक सतीश पाटील यांनी केली होती. या मागणीला सर्वसाधारण सभेत मंजुरी मिळाली आहे.

तसेच अग्निशमन दलासाठी १५ कोटींची वाहन खरेदी करण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. एकूण ११० चौरस किलोमीटर इतके कार्यक्षेत्र असलेल्या पनवेल महानगरपालिका अग्निशामक विभागामार्फत नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे बचाव कार्य करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान असलेले फायरफाईटींग वाहने असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे मल्टीपर्पज फायर इंजिन, रॅपिड इंटर्वेंशन व्हीकल, मल्टीपर्पज टर्न टेबल लँडर, वॉटर टँकर ही पाच वाहने पनवेल पालिका खरेदी करणार आहे. कब्रस्तान आणि अग्निशामक दलासाठी वाहन खरेदी करण्यासाठी मंजुरी मिळाल्याबाबत विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर, नगरसेवक सतीश पाटील आणि महाविकास आघाडीने आयुक्त गणेश देशमुख, प्रशासन यांचे आभार मानले आहेत.

कामोठे, खांदा कॉलनी, तळोजे, ग्रामीण भाग येथे फायर स्टेशन उभारणे. तसेच अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना जॅकीट, गंबूट, ग्लोज पुरवावेत, आणि खेडेगावात आग विझविण्यासाठी छोटे पिकअप खरेदी करुन विमा कवचाचे संरक्षण देणे अशी मागणी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी केली आहे.

> बऱ्याच वर्षांपासून रखडलेला प्रश्न तळोजा येथील मुस्लिम बांधवांच्या एकजुटीने आणि पाठपुराव्याने आज मार्गी लागला आहे.
> –प्रीतम म्हात्रे, विरोधी पक्षनेते

> दफनभूमीत पालिकेचे कर्मचारी नेमणे गरजेचे आहे. विषय मार्गी लागल्याबद्दल आयुक्त, प्रशासन यांचे आभार मानते.
> – डॉ सुरेखा मोहोकर, नगरसेविका

३८८ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी

। माणगाव । वार्ताहर ।

आझादी का अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या सूचनेनुसार महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग उपजिल्हा रुग्णालय माणगाव यांच्या मार्फत मोफत आरोग्य शिबीर २०२२ चे आयोजन मंगळवार, दि.१९ एप्रिल रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत यावेळेत उपजिल्हा रुग्णालय माणगाव याठिकाणी करण्यात आले होते. या शिबिराचा ३८८ गरजू रुग्णांनी लाभ घेतला.हे शिबीर उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रदीप इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाले.

या शिबिराचे उद्घाटन माणगाव तालुका समन्वय व पुनर्विलोकन समितीचे अध्यक्ष इकबाल धनसे, माणगाव तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती अध्यक्ष तुकाराम सुतार यांच्या हस्ते व तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुभाष केकाणे, उणेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच राजेंद्र शिर्के, मोर्बा ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच इकबाल हर्णेकर आदींसह इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात करण्यात आले.

बहिरीचापाडा येथे पाणपोईचे लोकार्पण

नवरात्र उत्सव मंडळ रांजणखारची सामाजिक बांधिलकी

। चौल । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक अशा विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या नवरात्र उत्सव रांजणखार नाका मंडळाने सामाजिक बांधिलकी जपत बहिरीचा पाडा येथे पाणपोई उभारली आहे. या पाणपोईचा लोकार्पण सोहळा नुकताच पार पडला. रक्तदान, श्रमदान आणि सामाजिक कार्यात योगदान देणाऱ्या या मंडळाने जलदान करुन आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटविला आहे.

नवरात्र उत्सव मंडळ रांजणखार नाका यांच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी कामे आजतागायत करण्यात आली आहेत. जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, पेढांबे प्राथमिक आरोग्य केंद्रात राबविलेले स्वच्छता अभियान असो, परिसरातील भुवनेश्वर मंदिर तसेच अन्य मंदिरांतील साफसफाई, तसेच महाड पूरग्रस्तांच्या घरांची केलेली स्वच्छता असो, वा रक्तदान शिबीर असो. अशा प्रत्येक कार्यात मोलाचा हातभार या मंडळाने लावून समाजाप्रती आपली असलेली नाळ अधिक वृद्धिंगत केली आहे. याच कार्याचा एक भाग म्हणून बहिरीचा पाडा येथे नागरिकांना पिण्यासाठी स्वच्छ आणि शुद्ध पाणी मिळावे म्हणून येथील मराठी शाळेच्या बाजूला पाणपोई उभारली आहे. तिचा लोकार्पण सोहळा हनुमान जयंतीच्या दिवशी पार पडला. रक्तदान, श्रमदान आणि सामाजिक कामाबरोबरच जलदानाचे कार्यदेखील करण्यात आले आहे. या पाणपोईमुळे मराठी शाळेतील मुले, एसटीला ये-जा करणारे प्रवासी आणि ग्रामस्थांना चांगला लाभ होईल, असे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले.

महागाईविरोधात काँग्रेसने रस्त्यावर उतरावे : टोकस

। नेरळ । वार्ताहर ।

भाजप काँग्रेसबाबत विविध माध्यमातून अपप्रचार करत असून महागाईच्या मुद्द्यांवरून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठी भावनात्मक मुद्द्यांना उचलून धरत आहे. अशा या भाजपचे अपप्रचार रोखून त्यांना चोख प्रत्युत्तर द्या तसेच काँग्रेसने आजवर समाजातील सर्व स्तरातील लोकांसाठी केलेल्या कामाचे महत्त्व पटवून द्या, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्ष चारुलता टोकस यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांना केले.

कर्जत तालुक्यातील राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या सदस्य नोंदणी आढावा बैठकीचे आयोजन साळोख तर्फे वरेडी येथे करण्यात आले होते. या बैठकीला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्ष चारुलता टोकस, अखलाक शिलोत्री, किरीट पाटील, वरिष्ठ जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, अल्पसंख्याक सेलचे जिल्हा अध्यक्ष रियाज बुबेरे, जिल्हा सरचिटणीस प्रमोद राईलकर, माजी सरपंच आवेश जुवारी, मुकेश सुर्वे, तालुका कार्याध्यक्ष संजय गवळी, युवक तालुका अध्यक्ष मनीष राणे, व्यापारी फेडरेशन तालुका अध्यक्ष अरविंद कटारिया, साळोख ग्रामपंचायत सदस्या मनीषा शिनारे, ललिता कांबरी, इस्माईल दिवाण आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मनसेने भागविली ग्रामस्थांची तहान

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत उमरोली हद्दीतील आषाणे गावात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडे ग्रामस्थांनी पाण्याची समस्या बोलून दाखवली होती. त्यावेळी मनसे रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील बोअरवेल खोदून देऊन पाण्याचा प्रश्न निकाली काढण्याचा शब्द दिला होता. तो शब्द मनसेच्या कार्यकर्त्यांनी पूर्ण केला असून, आषाणे गावात आता पाण्याच्या टाकीवर महिला पिण्याचे पाणी भरू शकणार आहेत.

या कामाला मनसे शाखा आषाणे सर्व पदाधिकारी यांनी देखील आर्थिक हातभार लावून ते काम पूर्णत्वास नेले. समीर कर्णुक यांनी सिंटेक्स टाकी साठी आर्थिक मदत केली. त्यामुळे दोन हजार लिटर क्षमता असलेली पाण्याची टाकी बसवून पाणी सर्वांसाठी खुले करण्यात आले. त्या पाण्याचा वापर ग्रामस्थांनी मनसेचे कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत केला.

आषाणे गावातील ग्रामस्थांनी जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, उपविभाग अध्यक्ष मनोज ठाणगे आणि मनसे शाखा आषाणे यांचे आभार मानले आहेत. त्यावेळी विभाग अध्यक्ष तेजस तुपे, उपविभाग अध्यक्ष मनोज ठाणगे, शाखा अध्यक्ष आशिष ठाणगे, कृष्णा श्रीखंडे, अजित श्रीखंडे, सचिन गायकर, जितेंद्र रूठे, पंकज बुंधाटे, प्रफुल्ल ठाणगे, रोशन जाधव, सोमनाथ ठाणगे, राकेश ठाणगे, प्रशांत ठाणगे, अविनाश ठाणगे, तुषार ठाणगे आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

माथेरानमध्ये गर्जला भीमाचा आवाज

। माथेरान । वार्ताहर ।

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिवस या त्यांच्या १३१ व्या जयंती दिवशी माथेरानमध्ये भारतीय बौद्ध महासभा माथेरान यांच्या कडून विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जातात. भारतीय बौद्ध महासभा माथेरान व नगरपरिषद माथेरान यांच्यावतीने सोमवार, दि. १८ एप्रिल रोजी श्रीराम चौक येथे भीमाची पोरं नावाने संगीत रजनी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी बहुजन समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मेळाव्यातून साधला विद्यार्थ्यांशी संवाद

झिराड येथील प्राथमिक शाळेत विविध उपक्रम

। अलिबाग। विशेष प्रतिनिधी।

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मुले शिकली पाहिजेत, जिल्हा परिषद शाळांमध्ये पटसंख्या वाढावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेण्यास सुरुवात झाली आहे. झिराड येथील प्राथमिक शाळेत मंगळवारी पालक व विद्यार्थी मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याच्या माध्यमातून जिल्हा परिषद माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

रायगड जिल्ह्यातील गावे, वाड्यांमधील मुलांना जिल्हा परिषद शाळांबद्दल आकर्षण निर्माण व्हावे यासाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. जिल्ह्यातील शाळांमध्ये नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळा पूर्वतयारी अभियानांतर्गत विविध उपक्रम सुरु केले आहेत. जिल्हा परिषद लोकप्रतिनिधींनीदेखील या उपक्रमात सक्रीय सहभाग घेऊन मेळाव्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला आहे. मंगळवारी शाळा पूर्वतयारी अभियानांतर्गत पालक व विद्यार्थ्यांचा मेळावा झिराड शाळेत घेण्यात आला. या मेळाव्यातून माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर यांनी जिल्हा परिषद शाळेचे महत्त्व पटवून देऊन पालक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी सरपंच दर्शना भोईर, सर्व सदस्य शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

महागणपती चरणी भक्त झाले नतमस्तक

। उरण । वार्ताहर ।

हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या चिरनेरच्या महागणपती चरणी नतमस्तक होण्याचा योग भाविकांसाठी मंगळवारी (दि. १९) आलेल्या अंगारकी चतुर्थी निमित्ताने जुळून आला. त्यामुळे महागणपती चिरनेर चरणी नतमस्तक होण्यासाठी नवी मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, पनवेल, पेण व उरण येथील अनेक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केल्याचे चित्र पहावयास मिळत होते. यावेळी मंदिर परिसराला जत्रा-उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले होते.

यावेळी मंदिरात श्रींचे अभिषेक, सकाळी काकड आरती, भजन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी भक्तगण भावनिक वातावरणात तल्लीन झाले होते. येणाऱ्या भाविकांना श्रींचे दर्शन सुलभ घेता यावे यासाठी मंदिर कमिटीचे ट्रस्टी संतोष ठाकूर, पदाधिकारी, ग्रामस्थ हिरीरीने सहभाग घेत होते. त्यामुळे भाविकांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसत होती. ही श्रीचरणी प्रार्थना अशी भावनात्मक प्रतिक्रिया पुरस्कार स्वीकारल्यानंतर विजय व विकास बंधूंनी व्यक्त केली.

इतिहास विभागाची शैक्षणिक सहल

। म्हसळा । वार्ताहर ।

वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅरिस्टर ए.आर. अंतुले विज्ञान महाविद्यालयाची इतिहास विभाग व हिस्टरी असोसिएशनद्वारे शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन कुडा मांदाड लेणीचे ठिकाणी करण्यात आले होते. सहलीत महाविद्यालयाच्या किशोरी वारे, अलिशा जाधव, पूजा भामरे, मिनाज काझी, धनवंती हांडे, अनिशा हांडे, अंजली साळवी, रोशनी नाक्ती या विद्यार्थ्यांबरोबर इतिहास विभाग प्रमुख व हिस्टरी असोसिएशनचे चेअरमन प्रा.डॉ. एस.यू. बेंद्रे, सदस्य प्रा.आर. एस. माशाळे, कर्मचारी अखलाक मुकादम यांनी सहभाग घेतला होता.

रणरणत्या उन्हात रानमेव्याची भुरळ

। पाताळगंगा । वार्ताहर ।

दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत असल्यामुळे प्रत्येक नागरिकांची अंगाची लाही-लाही होत आहे. या उन्हाच्या चटक्या पासून थकवा कमी व्हावे, यासाठी निसर्गाने या ऋतूमध्ये रसाळ फळे व रानमेव्याची निर्मिती केली असेल. त्यामुळे बाजारात पेठेच्या ठिकाणी जंगलातील रानमेवा दाखल झाले असून हा खरेदी करण्याचा नागरिकांचा कल मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

उन्हाळ्याचे आगमन होताच हा रानातील रानमेवा बाजारात आल्याने यामध्ये करवंदे, कैरी, अंजीर, काजू, चिंच आदी जंगलामध्ये तयार झालेला रानमेवा मोहपाडा, खोपोली, चौक या बाजारात दाखल झाला आहे. या रानमेव्यामुळे आदिवासी समालाला रोजगार मिळत असतो.

रुचकर, स्वस्त आणि औषधी असे बहुउपयोगी असलेल्या या रानमेव्याची अनेकांनी भुरळ पडत आहे. दुर्गम भागात राहणारे अदिवासीं बांधवांचे उत्पन्नाचे साधन म्हणून डोंगरातील रानमेवा असून उन्हाळ्याच्या दिवसामध्ये पटकन तोंडात टाकता येणारा तसेच शरीराला आणि मनाला गारवा देणाऱ्या या रानमेव्याला अधिक मागणी दिसत आहे. असह्य करणाऱ्या उन्हामध्ये अगदी पटकन तोंडात टाकता येणाऱ्या आणि खायला रुचकर असणाऱ्या या रानमेव्यांना लहान मुलांपासून मोठ्या मंडळींचीही मागणी असते. शरीराला थंडावा देणारा आणि औषधी गुणधर्म असणारा रानमेवा अगदी आवडीने खाताना दिसतात.

विद्यार्थ्यांच्या प्रेरणेतून 'ज्ञानसाधना'

स्वरचित कविता, प्रार्थना, लेखांचा समावेश

। पाली/बेणसे, वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील नाडसुर केंद्राचे सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा राजिप पाच्छापूर शाळेत नुकत्याच संपन्न झाल्या. यावेळी 'माझा नवा उपक्रम' अंतर्गत पाच्छापूर शाळेच्या 'ज्ञान साधना' या हस्तलिखिताचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

केंद्रप्रमुख कल्पना पाटील, मुख्याध्यापक अनिल राणे व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आणि सदस्य, शाळेतील शिक्षक जनार्दन भिलारे, कमलाकर तांडेल, रमेश पवार व धनाजी कोपनर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या आकर्षक, सचित्र व माहितीपूर्ण हस्तलिखितामध्ये विद्यार्थ्यांनी स्वरचित केलेल्या कविता, प्रार्थना व लेखांचादेखील समावेश केला आहे.

गटविकास अधिकारी विजय यादव व गटशिक्षणाधिकारी शिल्पा दास यांच्या प्रेरणेने व केंद्रप्रमुख कल्पना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पाच्छपूर शाळेतील विद्यार्थी आणि शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांच्या सहकार्याने मुख्याध्यापक अनिल राणे व शाळेतील सर्व शिक्षक आणि विद्यार्थी यांनी हे आकर्षक व माहितीपूर्ण हस्तलिखित तयार केले आहे. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष महेश वारंगे व सदस्य, सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रम छायाचित्रण व संकलन गोरख आघाव यांनी केले.

> विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व सृजशीलतेला वाव देणे आणि नवनिर्मितीचा आनंद मिळवणे हा मुख्य हेतू घेऊन ज्ञान साधना या हस्तलिखिताची निर्मिती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या हस्तलिखित मध्ये विद्यार्थी, शिक्षक यांच्यासह शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य यांनी सुद्धा नवनिर्मितीचा आनंद घेतला आहे.
> – अनिल राणे, मुख्याध्यापक, पाच्छापूर

सुप्त कलागुणांना वाव

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळण्यासाठी सांस्कृतिक व नाट्यीकरण स्पर्धा, मराठी, गणित, इंग्रजी या विषयाच्या मूलभूत कौशल्यावर आधारित प्रश्न देऊन स्पर्धा घेण्यात आल्या.

हस्तलिखिताचे वैशिष्ट्य

ज्ञान साधना या हस्तलिखितात तालुक्यातील ऐतिहासिक वास्तू, विद्यार्थ्यांना शाळेप्रती वाटणारा जिव्हाळा आणि विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यात आला आहे. हस्तलिखितामध्ये ताणतणावांचे व्यवस्थापन कसे करावे याबाबत माहिती आहे. तसेच शाळेत वर्षभर राबविलेले उपक्रम, शाळा बंद पण शिक्षण सुरु आदी महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. विविध शब्द खेळ व विषयानुरुप माहिती आदींचा सचित्र समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळण्यासाठी हस्तलिखित एक प्रभावी साधन आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- 'विहीरः आपल्या प्लॉट, वाडी, सोसायटीत रिंगांची विहीर करून पाण्याचा प्रश्न सोडवा अलिबाग–नागाव परिसरात. संपर्कःश्री. रणजित पाटील, अलिबाग, मोबा. ९८३४३०३९४१, ९८८१६३७०४७
- WORK FROM HOME 8975956964
- अलिबाग चोंढी येथे कामासाठी माणसे पाहिजेत. फोन नं.८२०८४५९४२४
- शंखेश्वर मेडिकल ऍजन्सीज येथे कामासाठी मुली/लेडिज हवेत (पिंपळभाट) मो. ९३७३७४७३४४.

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

वाघोशी शाळेचा नवोपक्रम

वार्षिक उपक्रम दिनदर्शिकेचे प्रकाशन

। सुधागड-पाली। वार्ताहर।

रा.जि.प. आदर्श शाळा वाघोशीने आपल्या नवोपक्रमात वार्षिक उपक्रम दिनदर्शिका तयार केली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. रायगड जिल्हा परिषदेच्या टिपणीस सभागृहात नुकताच हा कार्यक्रम संपन्न झाला.

या उपक्रमाबाबत डॉ. किरण पाटील यांनी सुधागड गटशिक्षणाधिकारी सुधागड शिल्पा दास व वाघोशी शाळेतील सर्व शिक्षकवृंदाचे कौतुक केले.

यावेळी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था पनवेलच्या प्राचार्या चंद्रकला ठोके, शिक्षणाधिकारी जोत्स्ना शिंदे, सुधागड तालुक्याच्या, गटशिक्षणाधिकारी शिल्पा दास, वाघोशी शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका अर्चना साळुंके, तसेच डाएट अधिव्याख्याता, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व जिल्हा टास्क समिती सदस्य उपस्थित होते.

ही दिनदर्शिका तयार करण्यासाठी खवली केंद्रप्रमुख शोभा खरात, मुख्यध्यापक दिलीप कोंजे, शिक्षक राजेश जाधव, उपक्रमशील शिक्षिका अर्चना साळुंके, मिनल म्हात्रे, हेमलता ठोंबरे व सुवर्णा घोडे यांचे सहकार्य लाभले.

उपक्रम दिनदर्शिकेची वैशिष्ट्ये

या आकर्षक, सचित्र व माहितीपूर्ण दिनदर्शिकेमध्ये शाळा पूर्व तयारी ते नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होईपर्यंत शाळेत राबविण्यात आलेल्या सर्व नवोपक्रमांची माहिती दिली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यात आला आहे. यामध्ये ताणतणावांचे व्यवस्थापन कसे करावे याबाबत माहिती आहे. तसेच शाळेत वर्षभर राबविलेले उपक्रम, शाळा बंद पण शिक्षण सुरू, अनापान उपक्रम, विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास, मुलाखत तंत्र, मैत्री पर्यावरणाशी, विविध शब्द खेळ, गणित जत्रा, विज्ञान जत्रा, स्वच्छता, आझादी का अमृत महोत्सव उपक्रम, व्यायाम व खेळ, अशा विविध नाविन्यपूर्ण नवोपक्रमांची आदर्श शाळा वाघोशी ची एका दृष्टीक्षेपात यशोगाथा छायाचित्र स्वरूपात सादर करण्यात आली आहे.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

Extension to E –TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/-+ GST

S.N.	Particulars	Description
1	Tender No. & Name of Tender	**RFx No.: 7000022562** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/Re-e-Tender-18/2022-2023** Extension Rfx Re-e-tender to work of Providing and Fixing of Marshalling Box for Fan and Pump Control of 200 MVA ICT-4 at 220kV Apta, 50 MVA TF at 220kV ONGC PNL, 50 MVA TF at 100kV Khopoli Substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 14,76,181/-, EMD amount Rs. 14,762/-**
2	Online Downloading the RFx .	**19.04.2022, 17:00 Hrs. to 26.04.2022, 11:00Hrs.**
3	Online Submission of the RFx	**On or Before 26.04.2022 up to 11:00 Hrs.**
4	Online Opening of the **Techno Commercial RFx**	**27.04.2022 at 11:05 hrs.(if Possible)**

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person :- The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
Note : All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
(M.C. JOSHI)
EXECUTIVE ENGINEER
EHV(O&M) DN. PANVEL

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

Re-E –TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

Sr.No.	Particulars	Description
1	Tender No. & Name of Tender	**RFxNo: -7000022791** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/ Re-e-Tender-21/2022-2023** RFx Re-e-tender for work of tree cutting work of various 100kV & 220kV Lines under EHV Lines S/Dn Panvel under EHV(O&M) Division Panvel. **Tender amount Limited to Rs. 11,55,009/-, EMD amount Rs. 11,550/-.**
2	Online Downloading the RFx	**18.04.2022, 18:00 Hrs. to 25.04.2022, 23:59 Hrs.**
3	Online Submission of the RFx	**On or Before 25.04.2022 up to 23:59 Hrs.**
4	Online Opening of the **Techno Commercial RFx**	**26.04.2022 at 11:00 hrs.(if Possible)**

Tender fees Rs. 500/- + GST
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person :- The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
Note : All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
(M. C. JOSHI)
EXECUTIVE ENGINEER
EHV(O&M) DN PANVEL

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे आवास, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जिरायत जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक सत्य नारायण सोमानी, व प्रेम सोमानी, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र.व उपविभाग	एकूण क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पैसे)
आवास, ता.अलिबाग	४५७/१/२	०-२०-००	१.२०

वर नमूद संपूर्ण मिळकत नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १९/०४/२०२२

ॲड.स्वप्निल नरेंद्र म्हात्रे
मु.बुरूमखाण, पो.वरसोली
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा क्र.९९२२७७७०१२

अपर तहसीलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, माणगांव यांचे कोर्टात

दावा क्रमांक ८५/२०२१

श्रीम.सुनंदा सखाराम मोहिते
रा.चांदोरे ता.माणगांव जि.रायगड — वादी

विरूध्द

१.श्री.गणेश पांडूरंग चांदोरकर
२.श्रीम.जयश्री पांडूरंग चांदोरकर
३.श्रीम.शारदा पांडूरंग चांदोरकर रा.मुंबई — प्रतिवादी

या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनूसूचीमध्ये नमूद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. त्याकामी सामनेवाला (जमीनमालक) यांना नोटीसची बजावणी दिलेल्या पत्त्यावर झालेली नाही. सामनेवाला (जमीनमालक) सध्या कोठे राहतात, याची माहिती नाही.

तरी वरील सामनेवाला (जमीनमालक) आणि अनूसूचित निर्दिष्ट केलेल्या मिळकतीमध्ये ज्यांचा हितसंबंध असेल त्यांनी अगर त्यांचे हक्क सांगणारे त्यांचे वालीवारस यांना स्वतःवकील अथवा प्रतिनिधीमार्फत दिनांक २०/०४/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, माणगाव, जि.रायगड येथे न्यायाधिकरणापुढे हजर राहून त्यांची बाजू मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचून, नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसूर करील. तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालून न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

अनुसूची

गावाचे नाव	गट नं.	क्षेत्र(हे.आर.पॉ.)	आकार(रू.पैसे)
चांदोरे ता.माणगांव जि.रायगड	१२३/४	०.८३.० ०.०९.० ०.९२.०	०.७०

ठिकाण : माणगांव
दिनांक : १३/०४/२०२२

सही/-
अपर तहसिलदार व
शेतजमिन न्यायाधिकरण, माणगांव

प्रोसेस फी जमा रु. ५०/- — ने.ता. ६/६/२०२२
अर्जदारतर्फे वकील
ॲड.जी.जी. गोंधळी

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज नं. ५१/२०२२

१) श्री. महेंद्र काशिनाथ म्हात्रे,
वय ६५ वर्षे, धंदा- समाजकार्य
रा. ४०१ गंगोत्री को.ऑप.हौ.सो.
पारसी वाडी, कोपरी कॉलनी,
ठाणे पूर्व ४०० ६०३
व राहणार बागमळा, पो. चौल
ता. अलिबाग, जि. रायगड — **अर्जदार**

२) श्री. प्रमोद काशिनाथ म्हात्रे
वय ६१ वर्षे, धंदा- निवृत्त
रा. हरीस्मृती ३ रा मजला,
चार्बाक चौक, इंदिरा नगर नाशिक
व राहणार बागमळा, पो. चौल
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुद्ध

कोणीही नाही — **सामनेवाला**

ज्याअर्थी कै. काशिनाथ जनार्दन म्हात्रे हे दिनांक २९-०९-२००१ रोजी मयत झाले, त्याचे पश्चात त्यांना अर्जदार नं. १ व २ हे मुलगे असे हयात वारस आहेत. त्यांची पत्नी कै. सुमती काशिनाथ म्हात्रे हि दिनांक १२-१२-२००५ रोजी मयत झाली आहे. अर्जदार व कै. काशिनाथ जनार्दन म्हात्रे आणि कै. सुमती काशिनाथ म्हात्रे हे मूळचे मौजे-बागमळा, नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील रहिवाशी असून तेथे त्यांचे राहते घर व शेतजमीन मिळकती आहेत. कै. काशिनाथ जनार्दन म्हात्रे आणि कै. सुमती काशिनाथ म्हात्रे यांस अर्जदार नं. १ व २ हे हयात कायदेशीर वारस आहेत. त्यांचेशिवाय अन्य कोणी वारस नाहीत. अर्जदार हे हिंदू धर्मीय आहेत. सदर अर्जदार यांनी मे. कोर्टाकडे वारसपत्र (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सबब, सदरचे वारसपत्र वरील अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमांच्या कोणत्याही प्रकारे हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाले तारखेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १८-४-२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- **कनिष्ठ लिपिक** — दिवाणी न्यायालय क स्तर अलिबाग
कोर्टाचा शिक्का
सही/- **अधीक्षक** — दिवाणी न्यायालय क स्तर अलिबाग

आरडीसीसी बँक

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग

जाहीर नोटीस

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग, शाखा-नवीन-पनवेल यांचे खालील नमूद लॉकर धारक यांनी १० वर्षांवरील कालावधीमध्ये लॉकर्सचे कोणतेही व्यवहार केले नसल्याने व सदर लॉकर्सचे भाडे थकीत असल्याने बँकेने सदर लॉकर्सचे पंचनामा करून ब्रेकओपन करण्याचा निर्णय घेतला आहे व सदर लॉकर्स संबंधित खातेदारांनी ओपन करणेबाबत बँकेने दिनांक १४.१२.२०२१ व दिनांक १२.०१.२०२२ रोजीचे रजिस्टर्ड नोटीसीने संबंधित खातेदारांना कळविले आहे.

१.श्री.तुकाराम बाबू पाटील, मु.पो.नेरे, ता.पनवेल, जिल्हा-रायगड लॉकर नं.ए-३४ (मध्यम)
२.श्री.चंद्रकांत धर्मा शेळके, मु.आदई, पो.नवीन-पनवेल, ता.पनवेल जिल्हा-रायगड लॉकर नं ए-३९(लहान)
३.श्रीमती मंदा दशरथ पाटील, मु.बि.१०/१०/२, से १३, नवीन-पनवेल, ता.पनवेल जिल्हा-रायगड लॉकर नं. ए-४(लहान)
४ श्री.चुनीलाल गोकुळदास खोसला, मु.प्लॉट नं.१५, रोड नं.१०, से नं.१, नवीन-पनवेल, ता.पनवेल, जिल्हा-रायगड-लॉकर नं.बी-१९(लहान)

आपणांस या नोटीसीद्वारे सूचित करण्यांत येते की, सदर कार्यवाहीबाबत आपल्या काही हरकती असल्यास आपण लेखी पत्राद्वारे आपले म्हणणे दिनांक ३०.०४.२०२२ पर्यंत प्रत्यक्ष सादर करावे व लॉकर्स ब्रेक ओपन करणेचे दिवशी आपण स्वतः उपस्थित राहणेचे आहे. असे न केल्यास ब्रेक ओपन प्रक्रियेत आपली कोणतीही हरकत नाही असे समजून आपले वरील नावाने असलेले लॉकर्स दिनांक ०५.०५.२०२२ ब्रेक ओपन करण्यांत येतील व त्यामध्ये असलेला ऐवज पंचनामा करून बँकेच्या ताब्यात ठेवला जाईल.

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांकः-१८.०४.२०२२

सही/-
उपमुख्य कार्यकारी अधिकारी

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल १) राहूल प्रताप कटारिया, २) शिवकुमार हिरालाल कटारिया, ३) अंकेश संजय टक्कर रा. लाज भवन, धामोते बस स्टँडजवळ, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१ खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमूद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसात कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन

मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र आर.चौ.मी.	आकार रुपये	आकार पैसे
चंद्रशेखर गजानन सारंगघर	१०१	१	३७८ चौ.मी.	३७	८०

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. उक्रुळ, पो. चिंचवली ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
ईमेल :- adv.jayeshmhase@gmail.com

सही/-
जयेश संभाजी म्हसे
(ॲडव्होकेट)
दिनांक :- २०/०४/२०२२
मो.नं. ९०२८९८२२७७

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

अर्जदाराचे वकील - ॲड.संस्कृती शिंदे
फौजदारी चौकशी अर्ज नं.९३/२०२२

माणगांव येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात,

श्री.प्रमोद शांताराम राणे — अर्जदार

विरूध्द

मा.ग्रामसेवक तथा जन्म आणि मृत्यू नोंदणी उपनिबंधक, वगैरे २ — सामनेवाला

ज्या अर्थी अर्जदार याने त्याचा जन्म दिनांक २१/०४/१९७९ रोजी मौजे बोंडशेत, ता.माणगांव, जि.रायगड येथे झाला असल्याबाबत जन्म दाखला मिळण्याकरीता जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी ज्या कोणाची अर्जदार याचा जन्म दाखला देण्यास हरकत असेल अगर त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत दप्तरी होणेंस हरकत असेल त्यांनी स्वतः अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत दिनांक २०/५/२२ रोजी सकाळी १०.३० वाजता कोर्टात उपस्थित राहून त्यांचे म्हणणे मांडावे. उक्त दिवशी व उक्त वेळी म्हणणे न मांडल्यास पुढील योग्य ते आदेश करण्यात येतील याची नोंद घ्यावी. करीता माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी जाहीरनामा प्रसिद्ध केला.

दिनांक : १३ /०४/२०२२

सही/- **कनिष्ठ लिपिक,** **दिवाणी न्यायालय क स्तर माणगांव, ता.माणगांव, जि.रायगड**
कोर्टाचा शिक्का
सही/- **सहाय्यक अधिक्षक,** **दिवाणी न्यायालय क.स्तर माणगांव ता.माणगांव, जि.रायगड**

जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीन मिळकत संदर्भित जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रणदिपसिंग कुलदिपसिंग मुंजराल यांच्याकडून कायमस्वरुपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशिल व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीन मिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही करारद्वारे वा दस्तद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

संदर्भित जमीन मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	गट नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
टेकाळी ता. अलिबाग जि. रायगड	४९६	६	१-२१-५०	५.५८

अलिबाग
दिनांक - २०/०४/२०२२

राजेंद्र दा. पाटील
ॲडव्होकेट
कृष्णवंदन-२, ब्राह्मणआळी
कन्याशाळेसमोर, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

महाराष्ट्र शासन
अलिबाग वनविभाग

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, श्री. दिनेश राधेश्याम अग्रवाल आरागिरणी विक्रीदार रा. नागोठणे, पो. नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड यांनी खाली सही करणार यांना कळविले आहे की, श्री. विश्राम दयालाल पटेल यांचे नावे असलेली, मौजे नागोठणे भूमापन क्र. १२७/१ब/२/२ मध्ये/ग्रामपंचायत नागोठणे हद्दीतील मालमत्ता क्र. ११९२ मध्ये असलेली नारायण सॉमील, नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड सॉमील परवाना क्र. जुना नं. ०६/२०१३ नवीन परवाना क्र. ०३/२०१४ आयडी नं. MH-2206 THAL व त्यामधील आरागिरणी यंत्र, साईज ४२ इंच उभा (एक) व ४२ इंच आडवा (एक) श्री. विश्राम दयालाल पटेल यांचेकडून श्री. दिनेश राधेश्याम अग्रवाल रा. नागोठणे यांना जागेसह विक्री करुन सदर सॉमील परवाना हस्तांतरण करण्याकामी प्रस्ताव या कार्यालयात प्राप्त झाला आहे.

तरी उक्त मालमत्तेवर वारसा, गहाणखत, विक्री, लिज, कायदेशीर हक्क, भेट किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हितसंबंध हस्तांतरण पुर्नस्थान निश्चय व विक्री संबंधात कोणत्याही आक्षेप असणाऱ्या व्यक्तीने व दावा करणाऱ्या व्यक्तींनी या सुचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १५ दिवसांत तदसंबंधी माहिती आवश्यक त्या कागदपत्रासह निम्न स्वाक्षरीकारांना खालील कार्यालयाच्या पत्त्यावर लेखी कळवावे. अन्यथा उक्त संबंधात कोणताही दावा वा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल आणि त्यानंतर कोणत्याही दावा व आक्षेप विचारात घेतला जाणार नाही.

अलिबाग दि. /०४/२०२२

सही/-
आशिष ठाकरे (भा.व.से.)
उपवनसंरक्षक
अलिबाग

कार्यालयाचा पत्ता
उपवनसंरक्षक, अलिबाग वनविभाग, यांचे कार्यालय
हिराकोट तळ्यापुढे, जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग
यांचे कार्यालयाजवळ, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड
अलिबाग पिन कोड क्र. ४०२२०१

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे बलीवरे, ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक जनार्दन सुदाम लहाने यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
१२७	७	०-७१-००	०-३७

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.२०/०४/२०२२
मो.९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
समीर हरिश्चंद्र लाड
शॉप नं.०५ अे, वृंदावन कॉम्प्लेक्स,
मुद्रे कर्जत, रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमूद केलेली मिळकत या संबंधी मा.उच्च न्यायालय येथे वाद प्रलंबित असून त्याचा अपिल क्र.८६९/२०१९ हा आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र.व उपविभाग	क्षेत्र हे.आर	आकार रू.पै.
गोंधळपाडा ता.अलिबाग	२६/२	०-१८-१० पोटखराबा ०-०१-३० एकूण ०-१९-४०	३.९३
गोंधळपाडा ता.अलिबाग	२७/१	०-४७-१० पोटखराबा ०-०६-३९ एकूण ०-५३-४०	१०.८७

सदरील मिळकती या जाहीर नोटीसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणीही, कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

पक्षकाराची मान्यता

ॲड.प्रथमेश अरूण पाटील
जिल्हा व सत्र न्यायालय, रायगड-अलिबाग
रूम नं.५, सागर दर्शन प्लाझा बिल्डिंग,
समाधान हॉटेलसमोर, कलेक्टर ऑफिसजवळ,
रामनाथ रोड, अलिबाग-४०२ २०१
मो.८००७८५५४५५/९९२१५५०५९५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकाकडून कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमूद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसात कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे नांदगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रुपये	आकार पैसे
१) धनंजय नागनाथ बक्षी	१८३	१ ब	१-५८-०	१	१६
२) प्रिती धनंजय बक्षी	१८३	१ क	०-६४-०	०	५२

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

सही/-
भुपेश तानाजी पेमारे
(ॲडव्होकेट)
दिनांक :- २०/०४/२०२२
मो.नं. ९१५८२७७२८

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमच्या अशिलांनी सदर जमिनीचे मालक यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र.	क्षेत्र चौ.मी.	आकार रु.पै.
चेंढरे, ता. अलिबाग	१३/५/६/६	१-९६-००	१९.६०

तरी वर नमूद बिनशेती मिळकतीवर सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विलास बाबाजी गुंजाळ यांचे व्यतिरिक्त अन्य कोणाही इसमाचा, संस्थांचा साठेकरार, कुळवहिवाट, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, गहाण, तारण, भाडेपट्टा, जाणे-येणेचा वहिवाटीचा मार्ग या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर कराव्यात. सदर मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २०/०४/२०२२

सही/-
ॲड. कौस्तुभ उदय पवार
जिल्हा न्यायालय अलिबाग

म ह त्त्वा चे

पुढील वर्षीपासून महिला आयपीएल

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

महिला आयपीएल स्पर्धा केव्हापासून सुरु होणार? या बहुचर्चित प्रश्नाचे उत्तर लवकर मिळेल असे संकेत मिळत आहेत. यासंदर्भात मागील काही दिवस भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) पदाधिकाऱ्यांची चर्चा सुरु आहे. नुकतीच यासंदर्भात बीसीसीआयच्या गव्हर्निंग कौन्सिलची बैठक झाली. यावेळी महिला आयपीएल स्पर्धांचे आयोजनावर सखोल चर्चा झाली. आता पुढील वर्षापासून ही स्पर्धा सुरु होईल, अशी माहिती बीसीसीआयच्या सूत्रांनी दिली.

इंग्लिश कौंटीत पुजाराचा धुमाकूळ

। नवी दिल्ली। वृत्तसंस्था।

कसोटी क्रिकेटमधील खराब कामगिरीमुळे कसोटीपटू चेतेश्वर पुजारा याला भारतीय संघातून वगळण्यात आले असले तरी इंग्लंडमधील कौंटी चॅम्पियनशिप डिव्हिजन दोनमधील एका सामन्यात ससेक्सकडून खेळताना त्याने घणाघाती शतक ठोकले आहे. एवढेच नव्हे, तर आपल्या संघाचा पराभव टाळण्यासाठी तो यशस्वी ठरला आहे. पुजाराने २४८ चेंडूंत १६ चौकारांच्या मदतीने ११५ धावा केल्या आहे. तसेच सलामीवीर टॉम हेन्ससोबत २३२ धावांची भागिदारी केल्याने संघ मजबूत स्थितीत आहे.

अलिबाग-मुरुड प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा

टायगर इलेव्हन वाघोली संघ विजेता

जिया एन्जेल खैरवाडी संघाला उपविजेतेपद

। रेवदंडा । वार्ताहर ।

रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती दिलीप भोईर पुरस्कृत अलिबाग-मुरूड प्रीमियर लीग २०२२ मर्यादित षटकांची टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आदिवासी समाज बांधवांसाठी आयोजित करण्यात आली होती. या मर्यादित षटकांच्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आदिवासी इलेव्हन स्टार असोसिएशनचे वतीने दि. १५, १६, १७ एप्रिल रोजी रेवदंडा हरेश्वर मैदानात पार पडली. या स्पर्धेत टायगर इलेव्हन वाघोली संघ जिया एन्जेल खैरवाडी संघाला पराभूत करीत अंतिम विजेता ठरला.

या स्पर्धेत टायगर इलेव्हन वाघोली प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला, तर जिया एन्जेल खैरवाडी द्वितीय, एंजल इलेव्हन किहीम तृतीय व एस.बी. चिंचवली चतुर्थ क्रमांकाचे विजेते ठरले. स्पर्धेत उत्कृष्ट फलदांज सागर, उत्कृष्ट गोलदांज सुभाष, तर अंतिम सामनाच्या सामनावीर किशोर नाईक व मालिकावीर किशोर नाईक यांची निवड करण्यात आली.

या स्पर्धेचा शुभारंभ राजिप माजी समाज कल्याण सभापती दिलीप भोईर यांच्या हस्ते करण्यात आला. या स्पर्धेत भगवान नाईक वरंडेपाडा पुरस्कृत- कै. भावेश इलेव्हन चौल, किशोर नाईक वाघोली पुरस्कृत टायगर इलेव्हन वाघोली, रूपेश नाईक बामणसुरे पुरस्कृत-पिंट्या गायकवाड बामणसुरे, यशवंत वाघमारे सारळ पुरस्कृत रोहन स्पोर्ट्स सारळ, नवनाथ नाईक बसणीपाडा पुरस्कृत जयेश एलेव्हन बसणीपाडा, अविनाश नाईक वरंडेपाडा पुरस्कृत रूद्र स्पोर्ट्स वरंडेपाडा, योगेश काष्टे खैरवाडी पुरस्कृत जिया एन्जेल खैरवाडी, सुभाष हिलम चिंचवली पुरस्कृत एस.बी. चिंचवली, सुभाष पवार किहीम पुरस्कृत एंजल खैरवाडी, मुकेश नाईक पुरस्कृत वरून वरद मॉगोज पळी, सुरेश नाईक चंदरवाडी पुरस्कृत वन किंग स्टार श्री गणेश, अशोक नाईक ताडवागळे पुरस्कृत विवेक इलेव्हन ताडवागळे, मंगळ नाईक श्रीगण पुरस्कृत जिजा एलेव्हन श्रीगण, काशिनाथ नाईक चंदरवाडी पुरस्कृत रियेश डायनामोस, अजय नाईक खुटलवाडी पुरस्कृत सार्थक इलेव्हन स्टार खुटळवाडी, अविनाश वाघमारे पुरस्कृत अन्वी इलेव्हन सारळ असे १६ संघ सहभागी झाले होते.

प्रथम क्रमांकास रूपये ५१ हजार रोख व चषक, द्वितीय क्रमांकास रूपये ३१ हजार रोख व चषक, तृतीय क्रमांकास रूपये २१ हजार रोख व चषक, चतुर्थ क्रमांकास २१ हजार रोख व चषक तसेच उत्कृष्ट फलदांज, उत्कृष्ट गोलदांज, अंतिम सामनावीर व मालिकावीर यांना विशेष बक्षिसे प्रदान करण्यात आली.

पॉवरलिफ्टिंग राष्ट्रीय स्पर्धेतील यशाबद्दल सन्मान

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळजवळील शेलू गावातील महाविद्यालयीन विद्यार्थिनी अमृता ज्ञानेश्वर भगत हिने केरळ येथे झालेल्या राष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशाबद्दल शेलू येथील घरी जाऊन सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य संघाकडून राष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेतील क्लासिक गटाच्या वयोगट ४७ ते ५२ किलो वजनी गटात राज्याचे नेतृत्व करणारी अमृता भगत ही केरळ येथील राष्ट्रीय स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकावर राहिली. नेरळ येथील मातोश्री टिपणीस महाविद्यालयात शिक्षण घेत असलेली अमृता हिच्या राष्ट्रीय स्पर्धेतील यशाबद्दल शेलू येथे जाऊन सत्कार करण्यात आला. शेलू येथे हुतात्मा हिराजी पाटील यांची प्रतिमा भेट देऊन या उदयोन्मुख क्रीडापटूचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी तिचे आई वडील, भाऊ हेदेखील आवर्जून उपस्थित होते. तर, शेलू ग्रामपंचायत सदस्य समीर मसणे, ज्येष्ठ ग्रामस्थ विलास डुकरे यांच्यासह नेरळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अंकुश शेळके, दामत ग्रामपंचायत सदस्य किशोर घारे, नेरळ रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष संदीप म्हसकर, संघटनेचे मिलिंद विरले, वसंत डांगरे आदी उपस्थित होते.

कोरोनामुळे सामन्यात बदल

। मुंबई । वृत्तसंस्था ।

आयपीएलच्या पंधराव्या हंगामाला सुरुवात होऊन तीन आठवडे झालेले आहेत. सर्व सामने सुरळीत सुरु असताना आता दिल्ली कॅपिटल्सच्या ताफ्यातील पाच जणांना कोरोनाची लागण झाली आहे. याच कारणामुळे खबरदारी येत्या २० एप्रिल रोजी दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात होणारा सामना हा पुणेऐवजी मुंबईत खेळवला जाणार आहे, असा निर्णय बीसीसीआयने घेतला आहे. प्रवासादरम्यान कोरोना संसर्ग होण्याची शक्यता असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

रग्बी स्पर्धेत नेरळ महाविद्यालयाला सुवर्णपदक

। नेरळ । वार्ताहर ।

मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालय रग्बी स्पर्धेत नेरळ येथील मातोश्री टिपणीस वरिष्ठ महाविद्यालयाने मुलींच्या गटाचे सुवर्णपदक पटकावले.

मुंबई विद्यापीठाच्या रग्बी स्पर्धा १२ ते १६ एप्रिल या कालावधीत कल्याण येथील बिर्ला कॉलेज येथे पार पडल्या. ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी नॅशनल रग्बी फुटबॉल स्पर्धेत नेरळ येथील विद्या मंदिर मंडळाच्या मातोश्री सुमती टिपणीस कॉलेज महाविद्यालयाच्या संघाने अंतिम विजय मिळवित सुवर्णपदक पटकावले. नेरळ येथील वरिष्ठ महाविद्यालयाचे हे दोन्ही खेळाडू रायगड जिल्हा रग्बी असोसिएशनशी संलग्न आहेत. रब्बी खेळाडू नीता राठोड आणि हर्षदा कोळंबे यांच्या संघाने हे सुवर्णपदक मिळविले आहे. या खेळाडूंचे क्रीडा शिक्षक प्रशिक्षक केशव पवार आणि खेळाडू यांचे रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांनी अभिनंदन केले आहे.

विठ्ठल रुक्मिणी चषक

ओवी इलेव्हन ऐनवहाळ मानकरी

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

ग्रामस्थ मंडळ व मुंबई मंडळ दिघेवाडी यांच्यावतीने विठ्ठल रुक्मिणी चषक २०२२ ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धा नुकतीच दिघेवाडी येथे पार पडली. या स्पर्धेतील अंतिम लढत ओवी इलेव्हन ऐनवहाळ आणि अंबोलेवाडी या दोन संघात झाली. या सामन्यात ओवी इलेव्हन हा संघ विजयी झाला.

दरम्यान, विजेत्या ओवी इलेव्हन संघास रोख रक्कम तीस हजार रु. व आकर्षक चषक, उपविजेता अंबोलेवाडी संघ वीस हजार रु. व आकर्षक चषक, तर तृतीय क्रमांक दुरटोली या संघास दहा हजार रु. व आकर्षक चषक चतुर्थ क्रमांक श्री राजे दिघेवाडी या संघास पाच हजार व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेतील मालिकावीर नयनेश पवार, उत्कृष्ट फलंदाज जय, उत्कृष्ट गोलंदाज महेश पवार, तर क्षेत्ररक्षक राज गोठणकर या खेळाडूंना आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेचे बक्षीस वितरण दिघेवाडी ग्रामस्थ मंडळ व मुंबई नवतरुण मित्रमंडळाचे पदाधिकारी तसेच आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. या स्पर्धेत २४ संघ सहभागी झाले होते.

कबड्डी स्पर्धेत स्वयंभू वरसगावची बाजी

आंबेवाडी संघाला उपविजेतेपद

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील गोवे येथील प्रकाशझोतात खेळविण्यात आलेल्या कबड्डी स्पर्धेत स्वयंभू वरसगाव व जय बजरंग आंबेवाडी यांच्यात झालेल्या अटीतटीच्या व शेवटपर्यंत रंगतदार ठरलेल्या सामन्यात अखेरच्या क्षणी स्वयंभू वरसगाव संघाने जय बजरंग आंबेवाडी संघाचा पराभव करुन विजेतेपद पटकावले. तर, आंबेवाडी संघाला उपविजेता पदावर समाधान मानावे लागले.

जय हनुमान मित्रमंडळ गोवे यांच्यातर्फे व कोलाड विभागीय असोसिएशनच्या मान्यतेने गोवे येथे कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन गोवे ग्रामपंचायत आदर्श सरपंच महेंद्र पोटफोडे, खांब विभागीय अध्यक्ष नरेंद्र जाधव, माजी सरपंच सुप्रिया जाधव, माजी उपसरपंच नितीन जाधव, संदीप जाधव, युवा नेते राकेश कापसे, राजेंद्र जाधव, नितीन जवके, श्री. महाडिक, कोलाड विभाग असोसिएशनचे अध्यक्ष गणेश सानप यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी गोवे गाव कमिटी अध्यक्ष नामदेव जाधव, सचिव श्रीधर गुजर, खजिनदार कमलाकर शिर्के, पोलीस पाटील सुरेश जाधव, तंटामुक्ती अध्यक्ष शांताराम पवार, माजी अध्यक्ष राजेश शिर्के, माजी सचिव लीलाधर दहिंबेकर, गोवे खांब क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र जाधव, सचिव शरद वारकर, भरत जाधव, नितीन वारकर, मनोहर मांजरे, स्वप्नील सानप, महेंद्र जाधव, रामा गुजर, सुरेश जाधव, नंदा जाधव, महादेव जाधव, बाबू पवार, गोविंद गायकवाड, व असंख्य कबड्डीप्रेमी उपस्थित होते.

स्व.मेघनाथ जासई संघ विजयी

। उरण । वार्ताहर ।

आशीर्वाद सांस्कृतिक कला, क्रीडा व सामाजिक संस्था धुतुम आयोजित सरपंच-उपसरपंच चषक २०२२ क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत २४ संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम सामन्यात स्व. मेघनाथ प्रतिष्ठान जासई संघाने ओम साई दारावे संघावर मात करीत चषक पटकाविला.

तत्पूर्वी, या स्पर्धेचे उद्घाटन पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या भैरवनाथ धुतूम या संघास चषक देऊन गौरविण्यात आले. तर, उत्कृष्ट फलंदाज स्पोर्ट सायकल, गोलंदाज, क्षेत्ररक्षक स्पोर्ट सायकल, मालिकावीर म्हणून बाईक अशी पारितोषिके प्रदान करण्यात आली.

स्पर्धेदरम्यान पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी जि. प सदस्या कुंदा ठाकूर, आदी मान्यवरांनी उपस्थित राहून खेळाडूंसह आयोजकांना शुभेच्छा दिल्या.

सुरेशभाऊ लाड चषक क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ

। कर्जत । वार्ताहर ।

कर्जतमध्ये सुरेशभाऊ लाड चषक भव्य ओव्हर आर्म नाईट टेनिस क्रिकेट स्पर्धेचे शानदार उद्घाटन संपन्न झाले. या स्पर्धा १८ व १९ एप्रिल रोजी खेळल्या जाणार आहेत.

ग्रीन व्ह्यू हॉटेलच्या मागे भिसेगाव मैदानावर नाईट टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते अमोघ कुळकर्णी व नगरसेवक सोमनाथ ठोंबरे यांनी केले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेचे उद्घाटन दि. १८ एप्रिल रोजी रात्री नऊ वाजता राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तानाजी चव्हाण, तालुकाध्यक्ष भगवान चंचे, नगरसेवक शरद लाड, माजी नगराध्यक्ष राजेश लाड यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी अतुल चंचे, सीताराम लदगे, रमेश लदगे, नथुराम लदगे, स्वप्नील जाधव, भिसेगावचे पोलीस पाटील संजय हजारे आदी उपस्थित होते. या स्पर्धेतील पहिल्या क्रमांकास एक लाख, दुसरा क्रमांक ७५ हजार, तिसरा क्रमांक ५० हजार, चौथा क्रमांक ३५ हजार, पाचवा क्रमांक २५ हजार, सहावा क्रमांक २५ हजार व आकर्षक चषक तसेच मालिकवीरसाठी सायकल, उत्कृष्ट फलंदाज कुलर, उत्कृष्ट गोलंदाज कुलर, आणि सामनावीर आकर्षक चषक अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन सोशल मीडियावर चर्चेत

। वर्षा मेहता ।
। अलिबाग ।

भारतातील आधीच अनिश्चित असलेल्या क्रिप्टोकरन्सी मार्केटवर आणखी शंका व्यक्त करताना, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, क्रिप्टोकरन्सीभोवतीचा सर्वात मोठा धोका हा मनी लॉन्ड्रिंग आणि दहशतवादी वित्तपुरवठा यासाठी वापरला जाण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या एका चर्चासत्रात निर्मला सीतारामन बोलत होत्या.

SOCIAL MEDIA पडसाद

सीतारामन यांनी कोव्हिड-१९ महामारीच्या काळात भारतात डिजिटल दत्तक घेण्याच्या दरात वाढ करण्यावर भर देत, डिजिटल जगात भारताची कामगिरी आणि डिजिटल पायाभूत सुविधा फ्रेमवर्क तयार करण्यासाठी सरकारच्या गेल्या दशकभरातील प्रयत्नांवर प्रकाश टाकला. निर्मला सीतारामन यांनी यापूर्वी सांगितले होते, की क्रिप्टोकरन्सी किंवा ब्लॉकचेन आणि फिनटेकच्या बाबतीत भारत सर्व पर्याय बंद करत नाही. सीतारामन यांनी सांगितले होते की, या विषयावर एक कॅबिनेट नोट तयार केली जात आहे, जी भारतातील क्रिप्टोकरन्सी नियमांच्या निर्मितीवर सर्व तपशील प्रदान करेल.

त्यांनी असेही सांगितले होते, की रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) २०२२ च्या अर्थसंकल्पात घोषित केल्याप्रमाणे भारताचे स्वतःचे डिजिटल चलन सुरू करण्यावर काम करत आहे. त्यांनी असेही सांगितले, की क्रिप्टो मालमत्तेवर कर आकारणी आधी लागू केली जाईल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)